



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक ५० * नांदेड * रविवार, दि. २२ फेब्रुवारी २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

## सरपंच पाहणार प्रशासक म्हणून कारभार

### मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींसाठी राज्य सरकारचा निर्णय

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यातील मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींबाबत राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेत प्रशासक पदाचा गुंता सोडवला आहे. आता ज्या ग्रामपंचायतींची मुदत २८ फेब्रुवारीपर्यंत संपत आहे, त्या ठिकाणी विद्यमान सरपंचालाच प्रशासक म्हणून नेमले जाणार आहे. यामुळे ग्रामपातळीवरील प्रशासनात सातत्य राहणार असून अचानक बदलामुळे निर्माण होणारी पोकळी टळणार आहे.

याआधी जानेवारी महिन्यात काढलेल्या परिपत्रकानुसार, २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला होता. मात्र, राज्यातील ग्रामपंचायतींची मोठी संख्या आणि विस्तार अधिकाऱ्यांची मर्यादित उपलब्धता लक्षात घेता प्रशासनासमोर अडचणी निर्माण होण्याची शक्यता होती. त्यामुळे सरकारने सुधारित निर्णय घेतला आहे.

नव्या निर्णयानुसार, ग्राम-पंचायतीची मुदत संपण्याच्या दिवसापर्यंत जे सरपंच पदावर असतील, त्यांनाच प्रशासक म्हणून नेमण्यात येईल. त्यांच्या मदतीसाठी विद्यमान उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांची प्रशासकीय समिती स्थापन केली जाणार आहे. यामुळे स्थानिक पातळीवर निर्णय प्रक्रिया सुरळीत राहण्यास मदत होईल आणि नव्या व्यक्तींना प्रशासन समजून घेण्यासाठी लागणारा वेळ वाचेल.

प्रशासक आणि प्रशासकीय समितीचा कालावधी त्यांच्या नेमणुकीपासून सहा महिने किंवा संबंधित ग्रामपंचायतीची निवडणूक पूर्ण होईपर्यंत, जे आधी होईल तेवढा राहणार आहे. हा तात्पुरता उपाय असून निवडणूक प्रक्रिया पूर्ण होताच नियमित निवडून आलेले पदाधिकारी कारभार स्वीकारतील.

राज्य सरकारने जारी केलेल्या परिपत्रकानुसार हा निर्णय सध्या २८ फेब्रुवारीपर्यंत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींसाठीच लागू राहणार आहे. या कालावधीत प्रशासक आणि प्रशासकीय समिती नेमण्याचे अधिकार संबंधित जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे असतील.

राज्यातील मोठ्या संख्येने ग्रामपंचायतींची मुदत संपत असल्याने सर्वत्र बाहेरील प्रशासक नेमणे व्यवहार्य ठरणार नव्हते. पंचायत समित्यांमधील विस्तार अधिकाऱ्यांची मर्यादित संख्या ही देखील मोठी अडचण होती. ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन सरकारने स्थानिक स्तरावरच विद्यमान सरपंच आणि त्यांच्या टीमकडे तात्पुरता कारभार सोपवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे प्रशासनात सातत्य, पारदर्शकता आणि वेग राखला जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## शिर्डीच्या साई मंदिर परिसरात वेषांतर करून चोरी

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – साईबाबा मंदिर परिसरात दर अर्ध्या तासाने कपडे बदलून भाविकांच्या गर्दीत मिसळत चोरी करणाऱ्या आंध्र प्रदेशातील टोळीचा शिर्डी पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या कारवाईत दोन महिला, एक पुरुष आणि एका अल्पवयीन बालकाला ताब्यात घेण्यात आले.

## जिल्ह्यातील १८ हजार विद्यार्थ्यांनी दिला बारावी गणिताचा पेपर

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील १११ केंद्रांवर इयत्ता बारावीची परीक्षा सुरु झाली असून शनिवारी गणिताच्या पेपरला एकूण १९ हजार ५६ परीक्षार्थ्यांपैकी १८ हजार ७४३ परीक्षार्थी उपस्थित होते. याप्रमाणे उपस्थितीची टक्केवारी ९८.३६ होती.

प्रत्येक केंद्रांवर बैठे पथकामार्फत झूम वेबकास्टद्वारे तसेच ड्रोन आणि व्हीडीओ कॅमेराद्वारे पूर्णवेळ परीक्षेवर नियंत्रण ठेवण्यात आले होते. यामुळे जिल्ह्यातील सर्व १११ परीक्षा केंद्रांवर आजची इयत्ता १२ वीची परीक्षा सुरळीत व कॉपीमुक्त वातावरणात झाली.

शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी जिल्ह्यातील काही केंद्रांवर परीक्षा कालावधीत परीक्षेशी संबंधित नसलेली व्यक्ती नजर आल्यास भारतीय न्यायसंहितेचे कलम १६३ चे उल्लंघन होत असल्यास संबंधितांविरुद्ध भारतीय न्यायसंहितेचे कलम १६३ चा भंग केल्यामुळे कारवाई करण्यात येईल, असा सज्जड इशारा जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी दिला होता. त्याचा परिणाम म्हणून शनिवारी परीक्षा केंद्रावर परीक्षा प्रक्रियेशी संबंधित नसलेली व्यक्ती दिसून आली नाही.


## बीड एसीबीच्या पथकाने तहसीलदार मुंडेंच्या नांदेडमधील घराची घेतली झाडाझडती; सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– बीड जिल्ह्यातील परळीचे तहसीलदार व्यंकट मुंडे शुक्रवारी बीडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लावलेल्या सापळ्यात अडकले. सायंकाळपर्यंत गुन्हा नोंद करून त्यांना अटक करण्यात आली होती. यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने मुंडे यांच्या नांदेड शहरातील यशोविहार येथील घराची झडती घेतली. या घरातून पोलिसांनी १३ तोळे सोने व ५५ हजार असा मुद्देमाल जप्त केला.

नांदेड जिल्ह्यातील लोहा, मुखेड येथे काही वर्ष काम केलेले हे तहसीलदार मुंडे नेहमीच वादग्रस्त राहिले आहेत. परळी येथे तहसीलदार मुंडे यांनी तक्रारदाराकडे (सालंसी) ऐपत प्रमाणपत्रासाठी ५० हजार रुपयांची लाच मागितली होती. तडजोडीअंती २० हजार रुपये घेण्याचे ठरले होते. यानुसार लाचलुचपत विभागाने शुक्रवारी सापळा लावला. परंतु तहसीलदार मुंडे यांना तक्रारदारावर संशय आल्याने त्यांनी लाचेची रक्कम स्वीकारली नसली तरी त्यांच्याविरुद्ध कारवाई करून गुन्हा दाखल करण्यात आला. सायंकाळी मुंडे यांना अटक करण्यात आल्यावर परळी वैजनाथ येथील घरीही तपासणी करण्यात आली. मात्र या ठिकाणी काही आढळून आले नाही. स्वतः तहसीलदार मुंडे यांच्याकडे ८० हजार झडतीमध्ये आढळून आले होते. यानंतर शनिवारी नांदेड शहरातील यशोविहार येथील त्यांच्या घराची पथकाने झाडाझडती घेतली. यात १३ तोळे सोने व ५५ हजार रुपये रोख मुद्देमाल जप्त केला. त्यात १ तोळ्याचे मिनीगंठण, ६ तोळ्याच्या पाटल्या, ५ तोळ्याचे सोन्याचे कडे, १ तोळ्याचे मंगळसूत्र आणि ५५ हजार रुपये रोख असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, नांदेड येथील अधिकाऱ्यांनी या वृत्ताला दुजोरा दिला. तर सोनपेठ तालुक्यातील शिरशी येथील मूळ घरीही तपासणी केल्याची माहिती मिळाली आहे.




**नांदेड** – येथील अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव लिखित अल्पावधीत लोकप्रिय ठरलेल्या 'विद्यार्थी धर्म' या पुस्तकाला उत्कृष्ट साहित्यकृती ग्रंथ हा पुरस्कार अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांना शेखर गायकवाड व महाजन यांच्या हस्ते यशदा व पुणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बालगंधर्व सभागृहात पुणे येथे प्रदान करण्यात आला. यावेळी जिल्हा व सत्र न्यायाधीश सुनील वेदपाठक यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.




## नागपुरात बारावीचा पेपर फुटला

**नागपूर (प्रतिनिधी)** – राज्यात दहावी-बारावीची परीक्षा कॉपीमुक्त आणि तणावमुक्त वातावरणात पार पडावी म्हणून राज्य मंडळाने शर्थीचे प्रयत्न केले. मात्र त्यानंतरही अनेक प्रकार समोर येत आहेत. अशातच नागपुरातून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. नागपूरमध्ये चक्क बारावीच्या दोन विषयांचे पेपर फुटल्याची माहितीसमोर आली आहे. नागपूरच्या सदर पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, व्हाट्सअप ग्रुप तयार करून हा सगळा पेपर फोडण्याचा प्रकार सुरू असल्याची पोलिसांना माहिती मिळाली. यात बारावीच्या विज्ञान शाखेचे फिजिक्स आणि केमिस्ट्रीचा पेपर परीक्षेच्या तासाभरापूर्वीच व्हाट्सअपवर आल्याची माहिती आहे. गुरुवारी बारावी केमिस्ट्रीचा पेपर होता. मात्र परीक्षेआधी पेपर विद्यार्थ्यांच्या व्हाट्सअप ग्रुपवर आला होता. नागपूर शहरातील सदरच्या सेंट उर्सुला परीक्षा केंद्रावर हा प्रकरण उघडकीस आला आहे.


मा.श्री.माधवराव पाटील शेळगावकर

गौरव सोहळा

आणि आत्मचरित्र प्रकाशन सोहळा



रविवार, दि. २२ फेब्रुवारी २०२६
वेळ: सकाळी ११ वा.

आपणास निमंत्रीत करतांना आनंद होतो की, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते
**श्री.माधवराव पाटील शेळगावकर**
(प्रथम अध्यक्ष, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता समिती, महाराष्ट्र राज्य मुंबई)
यांचा 'गौरव सोहळा' व त्यांच्या आयुष्यावर आधारीत
**'माझी ग्रामविकासाची शेती' या आत्मचरित्राचा प्रकाशन सोहळा**

* शुभहस्ते – **मा.श्री.शरदचंद्रजी पवार साहेब** (माजी कृषीमंत्री, भारत सरकार)

* कार्यक्रमाचे अध्यक्ष
**मा.श्री.कमलकिशोर कदम** (माजी शिक्षणमंत्री, महाराष्ट्र राज्य)

मुख्य अतिथी*
**मा.खा.श्री.अशोकराव चव्हाण** (माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य)

* प्रमुख पाहुणे *

**मा.ना.श्री.बाबासाहेब पाटील** (सहकारमंत्री, महाराष्ट्र राज्य)
**मा.पद्मश्री पोपटराव पवार** (कार्याध्यक्ष, आदर्शगाव संकल्प प्रकल्प योजना म.रा.)
**मा.आ.श्री.पाशा पटेल** (अध्यक्ष, कृषिमूल्य आयोग, भारत सरकार)
**मा.आ.श्री.हेमंतभाऊ पाटील** (अध्यक्ष, हळद संशोधन समिती)

**मा.खा.श्री.प्रा.रविंद्र चव्हाण** (खासदार, नांदेड)
**मा.खा.डॉ.श्री.अजीत गोपछडे** (राज्यसभा सदस्य, नांदेड)
**मा.खा.श्री.नागेश पाटील आष्टीकर** (लोकसभा सदस्य, हिंगोली)

* प्रमुख उपस्थिती *

- मा.खा.श्रीमती सूर्यकांताताई पाटील (माजी केंद्रीय ग्रामविकास मंत्री, भारत सरकार)
- मा.खा.श्री.भास्करराव पा. खतगावकर (माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य)
- मा.डॉ.श्री.माधवराव किन्हाळकर (माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य)
- मा.आ.श्री.डी.पी.सावंत (माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य)
- मा.श्री.पुरुषोत्तम खेडेकर (संस्थापक, मराठा सेवासंघ)
- मा.आ.श्री.प्रतापराव पा. चिखलीकर (सदस्य, लोहा-कंधार विधानसभा)
- मा.आ.श्री.राजेश पवार (सदस्य, नायगाव विधानसभा)
- मा.आ.श्री.विक्रम काळे (सदस्य, विधानपरिषद)
- मा.आ.श्री.सतिश चव्हाण (सदस्य, विधानपरिषद)
- मा.आ.श्रीजयाताई अशोकराव चव्हाण (सदस्य, भोकर विधानसभा)
- मा.आ.श्री.बालाजी कल्याणकर (सदस्य, नांदेड-उत्तर विधानसभा)
- मा.आ.श्री.आनंदराव बोंढारकर (सदस्य, नांदेड दक्षिण विधानसभा)
- मा.आ.श्री.जितेश अंतापूरकर (सदस्य, देगलूर-बिलोली विधानसभा)
- मा.आ.श्री.बाबुराव कदम (सदस्य, हदगाव-हिमायतनगर विधानसभा)
- मा.आ.श्री.भीमराव केराम (सदस्य, किनवट-माहुर विधानसभा)
- मा.आ.श्री.अमरभाऊ राजूरकर (माजी आमदार, विधानपरिषद, नांदेड)
- मा.आ.श्री.हणमंतराव पा.बेटमोगरेकर (जिल्हाध्यक्ष, नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटी)
- मा.डॉ.श्री.गोविंद नांदेडे (माजी शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य)
- मा.आ.श्री.माधवराव पा. जवळगावकर (माजी आमदार, हदगाव विधानसभा)
- मा. श्री. श्रीकांत देशमुख (साहित्य अकादमी पुरस्कार विजेते)
- मा.आ.श्री.शंकरअण्णा धोंडगे (माजी आमदार, कंधार-लोहा विधानसभा)
- मा.श्री.शिरीष गोरठेकर (माजी सभापती, पं.स.उमरी)
- मा.श्री.मल्लिनाथ कलशेट्टी (माजी सचिव, ग्रामविकास, महाराष्ट्र राज्य)
- मा.श्री.गुणवंत पाटील हंगरगेकर (सदस्य, एम.एस.पी. समिती भारत सरकार)

**मा.श्री.चंदू पाटील मारकवाड** (सरपंच, राज्यस्तरीय प्रथम गाव, राजगड जि.चंद्रपूर)

वरील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होत आहे. तरी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

**कार्यक्रम स्थळ : शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह, स्टेडीयम परिसर, नांदेड**

प्रकाशक : निर्मलकुमार सूर्यवंशी निर्मल प्रकाशन

गौरव सोहळा समिती

**मा.श्री.राजेश देशमुख कुंटूरकर** (अध्यक्ष, कुंटूरकर शुगर्स लि.)
**मा.श्री.दिलीपराव धर्माधिकारी** (प्रदेश सरचिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
**मा.श्री.एकनाथ उर्फ अनिल मोरे** (माजी सनदी अधिकारी व सिने अभिनेता)
**मा.श्री.प्रा.प्रभाकरराव पवार** (माजी उपप्राचार्य जनता हा.व ज्यू.कॉलेज, नायगाव)
**मा.श्री.मारोतराव कवळे गुरुजी** (उद्योजक)
**मा.श्री.शिवाजीराजे पाटील** (लेखक व व्याख्याते)
**मा.श्री.संगमेश्वर लांडगे** (संचालक राजमुद्रा न्युज)

विनीत– बळवंत माधवराव पाटील, संजय माधवराव पाटील, राज माधवराव पाटील, अभिमन्यू शहाजी पाटील, शिवराज गुणवंतराव पाटील, विजय गुणवंतराव पाटील

# खटल्याचा निकाल कसा लावू?

वऱ्हाडी कथा

दिवसा गनीक म्हता-या लोकयचं दुसरं घरं.... म्हनजेचं वृध्दाश्रमातली म्हता-यायची संख्या दिवसांदिवस फुगूनं राह्यली. याले कारण एक नसूनं हजार हायेत. लेकरू बंबई, पुन्यात,नागपूरात , औरंगाबाद अश्या मोठ्या शहरात शिकलं की, त्याले ईदेश खुनावते नवकरीसाठी... मंग थो ततिसाचं लगनं करूनं सेटलं होवूनं जाते. मंग मायबाप मेले तरी थो पाहाले जात नाह्यी. अग्नी द्याले येत नाही. त्याले प्यारी असते बायको, लेकरं अन् फकस्त पैसा....माय बाप म्हनजे जुनाटं झालेली वस्तू असं त्याले वाटते.

आता बंबईतले काह्यी किस्से घेवू. लान लान खोप्या सारखे घरं. पोराचं लगनं झालं की, शेपरेट खोली पाह्यजे...पैसा असते पन् जागा नसते. मंग थो पोरगा मायबापाले पैसे भरूनं वृध्दाश्रमात ठेवते. दोन हजार रूपयात दोन टाईम मोजकं जेवनं, दोन टाईम चा, एक टाईम नास्ता....सारे सवंगडी म्हतारे. दिवाई, दसरा, होई, गनपती, नवरात्र, गुळीपाडवा कोनताही सण असो. तेयले वृध्दाश्रमातचं मनवा लागते. काय थ्या म्हता-या माय बापाले पोराची, पोरीची याद येत नसनं, नातवाले कळीवर घेवूनं, मुके, गालगुच्चे घ्यावं वाटत नसनं, दुखल्या खुपल्याले लेकरानं आपुलकीनं चौकशी कराव अस वाटत नसनं. अरे मी त अस म्हननं की दिवसरात, घळीघळी तेयच्या मनाचा तळतळाट थ्या पोरायले लागत असनं. ह्याले जबाबदार कोनं....रेडिओ, टेलिव्हिजन, मोबाईल, इंटरनेट, विभक्त कुटुंब पद्धती, संसंकाराचा -हास....आजलोग कोनं आयकलं काय? की कास्तकारानं त्याचे माय बाप वृध्दाश्रमात ठेवले. तर त्याचं ऊत्तर असनं ...नाह्यी.

असचं एकवेळ कटिंगच्या दुकानात पेपर वाचतानी मले एक बातमी साजरी वाटली. सारी बातमी वाचली अन् टचकनं डोयात पानी आलं..... थे बातमी होती गुजरात इथल्ली.

पा त कशी.... लायन्या सग्ग्या भावानं मोठ्या भावावर कोर्टात केस केली. कामून....कामून त तीस वरषापासूनं मोठा भाऊ त्याच्या घरी मायबापाची सेवा करूनं राह्यला म्हनूनसन्या.. अन त्यांच्या लायन्या भावाले सेवा बिलकूलं न करू देता. सेवा ही कशी करे थो ... मायबापाची रोज हातानं आंघोय करूनं देनं, तेयले कपळे घालूनं देनं. तेयले वक्तावर चा, नास्टा, जेवन देनं, बाहेर फिराले नेनं, लागलं सवरलं आनूनं देनं, वक्तावर गोया औसद देनं, पाय दाबनं..तेयच्यासंग बोलत राह्यनं...तेयले पेपरं वाचूनं दाखवनं....अस सारं सारं थो करे. मोठ्या भावाले तारकीची कोर्टात हजर व्हाची नोटिस वकिला मार्फत बजावन्यात आली. देल्लेल्या तारखेवर दोघंही भाऊ हजर झाले. अन् वकिलांन पयले मोठ्या भावाले कटघ-यात बलावलं.... वकिलानं त्याचे सवालं चालू केले. नरेंद्र जी तुमच्या लायन्या भावाना तुमच्यावर खटला भरला की, तुम्ही तुमच्या मायबापाची सेवा लायन्या भावाले विरेन्द्र ले करू देत नाही. भरू द्या ना खटला साहेब. मले काही फरक पळत नाही. माह्य काम नितनेमानं मी करत होतो .... अन् करत राह्यीनं . अन् हाव अखिनं एक गोठ मायबापाची सेवा करनं जर गुन्हा असनं त हा गुन्हा मी घळीघळी करनं. वीरेंद्र चा वकील न्यायधिशाकळे पाहूनसन्या म्हनते .... मिलार्ड पा हा नरेंद्र.... पा किती जब्बर हायं. ऊलटे ऊत्तर देत हायं. एकत मायबापाले सोळत नाही. दिवस रात सेवा करते. अन लायन्या भावाले सेवा करू देत नाही. निकाल आमच्या पक्षाकडूनं लावावा हि आपणास विनंती आहे .

अस बोलूनं वीरेंद्र चा वकील बसला. शिपायानं वीरेंद्र ले कटघ-यात जोरजो-यात पुकारा करूनं बलावलं. नरेंद्र चा वकील ऊभा झाला. वीरेंद्र कटघ-यात ऊभा राहला...नरेंद्र च्या वकिलानं सवालं चालू केले ....

नरेंद्र तुमचा कोनं?

अहो भौ!कोन म्हनजे...असे कसे सवालं करूनं राह्यले. मला फक्त ऊत्तर अपेक्षित आहे. प्रति प्रश्न नाही. हा वकील खास करूनं नरेंद्रनं पुन्यावरूनं बोलावला होता. अतिशुद्ध मराठी बोलनारा वकील आशय. नरेंद्र माह्ये मोठे भौ.

बरं! तुम्हाला तुमचे जन्मदाते म्हणजे आई आणि बाबा कशाला पाहिजे. काहाले म्हनजे. ... सेवा कराले. तुमचे मोठे बंधू काय करतात. तेच करतात ना मग वेगळी तुमची सेवा कशाला. अहो माह्यी माय नव्वद वरषाची हायं अन माह्ये बा पंच्यान्नव वरषाचे हायेत...अन आता माह्या भौ ही म्हतारा होतं चालला. आता माह्या दादाचं वय पासस्ठ वरीष हायं...मले आता तिघाचीही सेवा कराची हायं...मले काहीही करूनं तिघायचा ही ताबा द्या....नरेंद्रचा वकील जसा बुचकाळ्यात पळला होता. तसाचं न्यायाधिशही...कोनाचं काह्यी केल्या डोक्स चालेना.मा. न्यायाधिशनं पंधरा दिवसा बादची तारीक देल्ही.

न्यायाधिश घरी गेला. कोनाच्या बाजूनं निकालं द्याव ह्या ईचारात थो पळला होता. ह्या कलियुगात मायबापावर येवळे पेरम करनारे लवकुश कवाच पाह्यले नोव्हते. न्यायाधिश एका अडगळीच्या खोलीत गेला. एका संदूकित ठेवलेला मायबापाचा फटू काहाळला. फटू पुसूनं भितीवर टांगला. फटू पाहूनसन्या थो धाय मोकलूनं लळाले लागला. तितक्यात त्याची बायको आली. तीनं सासूसास-याचा फटू भितीवर टांगलेला पाहूनसन्या तीचा पारा चळला अन् थे जोरजो-यात बोंबलाले लागली...पयले मले सांगा. हा फटू अतिसा आला कसा.

न्यायाधिशनं सहज ऊत्तर देल्लं ...अडगळीच्या खोलीतूनं. हा फटू अतिसा आनाची तुमची हिंमत कशी झाली. आणि हा फोटो अतिसा हॉल मंदी सोभते तरी काय. न्यायाधिश जरा रागात अन् धीरगंभीर भाव तोंडावर आनूनसन्या त्याच्या बायकोले म्हनला... ललिता तुह्य बराबर हायं व हा फटू इथ सोभत नाही. ह्या फटूची जागा देव्हा-यात हायं व....माह्या जनम दात्या देवायले म्या घरातूनं काहाळूनं वृध्दाश्रमात टाकलं व....ललिता वृध्दाश्रम म्हनजे जनावराचा कोंडवाळाचं ना व.... ललिता जरा फनफनत नव-याले म्हनाली...

खबरदार ! जर तुमच्या मायबापाचं नाव माह्या ह्या घरात घेतलं त . थे तुमचं पारायनं कोर्टात सांगत जा. घरात नाह्यी. तुह्या घरात! म्हनजे.. हे घर तुव अन् माह्या मायबापानं कष्ट करूनं, रगताचं पानी करूनसन्या मले जे शिकवलं सवरवलं थे गेलं चुल्यात...थे गेलं काय? गधीच्या गांडीत...सांग अगूदर मले.

ललितानं अवाजाचा सुर आता खालच्या पट्टीत ऊतरता झाला होता. न्यायाधिश फटू कळे पाहूनसन्या लळाले लागला होता. मनातल्या मनात पुटपुटत होता......'.देवा सारख्या मायबापाले म्या वृध्दाश्रमात टाकले रे देवा...मले ऊलिसा ताप जरी आला तरी रातरातभर डोक्शावर वल्या पट्ट्या ठेवत, दिठ काहाळतं, माय पदरं ऊतरवे, देवाले नवस कबूल करे. वईदवान्याकळे धावपय करत. अन् म्या ह्या माह्या लालची बायको पायी माह्या देवासारख्या मायबापाले वृध्दाश्रमात धाळूनं देल्लं. कुठीसा फेळनारं हे पाप देवा...' अस म्हणूनसन्या जोरजो-यात लळत होता. तितक्यात त्याची बायको मंधात म वाळधुर्त शब्द तोंडात आनूनं नरमाईनं बोलाले लागली....अहो मी काय म्हणतो ...तथिसा तुमचे आई बाबा हायेत त खुशीतचं हायेतं. तेयच्या वयाचे लोकं हायेतं बोलाचालाले. कपळ्यातच हागले त धुनारे अन् कायजी घेनारे हायेत तथिसा...आपन तेयले दरमयन्याले चार हजार रुपये मयना ही देतोचं ना...आपनं काय तेयले वा-यावर सोळले काय? तुह्या मायची टांग त! आता एक शबूद ही तोंडाच्या बाहेरे आला नाही पायजे तुह्या . नाहीतं मीच आरोपी, मीच पोलीस, मीच वकिल अन् हे घर न्यायलय अन् मी न्यायाधिश त हायेचं मी तुह्या निकालं आज, आत्ता, ताबडतोब अथिसाच लावनं एक घळीभरही ना दवळता...आता तू ऊगी राह्य...एक तप झाला माह्या माय बापाले वृध्दाश्रमात जावूनं... ईतल्या वरषात ना तेयची खबर घेतली...ना तेयले भेटाले गेलो... ना सनावाराले घरी आनलं...ना हाल हवालं पुसले...काय फायदा देवा आता तुच सांग! काय फायदा...ह्या घरादाराचा, ह्या मोटारगाळीचा, ह्या धनदौलतीचा...काय फायदा...फायदा काय... देवा तूच सांग आता काय करू...डोक्स घेवू की काय जीव देवू... देवा सारख्या गरीब मायबापाले म्या वृध्दाश्रमात टाकलं....कुठ फेळू हे पाप आता....न्यायाधिशानं रूमालाले नाक शिकरत अन् एका बाजूनं आसू पुसत मनातल्या मनात म्हतलं....' मी आताच्या आता जातो म्ह्याया मायबापाजौळ ...'

न्यायाधिश बसंतानं पटपट तयारी केली. बंगल्याच्या आवारातूनं बाहेरं गाळी काहाळली ...मायबापाचे चेहरे आठवत थो गाळी पिटायत होता. मंधात मिठाईचं स्वीटमार्ट लागलं. तथूनसन्या त्यानं मायसाठी महैसूरपाक घेतला, बापासाठी ईमरती घेतली. गाळी डांबरी रसत्यायनं सुसाट पयत होती....कवा माय बापाले भेटनं अस् बसंताले झालं होतं. त्याचा डोयातूनं आसवाच्या धारा लागल्या होत्या गेअर वर गेअर पळत होते. रस्ता मांग मांग सरत होता. पयल्यांदाच गाळी पाचव्या गेअर वर अन् एकशे चाळीस च्या इस्पीडवर चालली होती. वृध्दाश्रम जौळ जौळ येत होतं. तशी वसंताले हुरहुर लागली होती. आता गाडीची स्पीड कमी कमी होत होती. बसंताचं आंग थरथर कापत होतं. ' माह्ये माय बाप कसे असतीनं रे देवा .' वसंता मनातल्या मनात म्हनत होता. गाळी वृध्दाश्रमाच्या गेटवर थांबली. गेटवर लिहलेलं नाव ' आमचे घर ' हे वाचले. वसंतानं चवफवताल पाह्यलं. तीन मजली इमारत, कंपाऊंडले लागूनं मोठमोठी झाळं. हिरवागार गालीचा...गालीच्यावर लोखंडी खुर्च्या त्याच्यावर काही म्हतारे गप्पागोष्टी करत बसली होती. वसंताच्या मनाची अगतिकता अखीनचं वाहाळली होती. थो जरा पटपट पावलं टाकतं. वृध्दाश्रमाच्या कार्यालयात गेला. एक तीशितीली तरूण बाई त्याले दिसली.

त्यानं आपलं नावं अडखळत सांगलं...

माह्यं नाव वसंत आनंदराव कुलकर्णी.

ती तीशितली बाई डोये वटारूनं वसंताकळे पाह्यत होतं... मंग...मान ऊंचावूनं तीनं म्हतलं... माह्ये आईबाबा हायेत अतिसा आनंदराव अन् कौसल्याबाई...

थे बाई माथ्यावर आट्या जमा करूनं अन् अन् डोये मिचमिचे करूनं मेंदूले तानं देवूनं अन् डोक्स खाजवत ईचार करतं होती...अन् तीनं वसंताले अपेक्षित नसलेलं ऊत्तर आखरीले देल्लं... आनंदराव कुलकर्णी नावाचं तर असल्याचं वाटत नाही पन् कौसल्याबाई कुलकर्णी नावाच्या हायेत. त्या बघा तिथे एका कोपऱ्यात ऊन खात बसलेल्या हायेत. थ्या बाईनं बसंताच्या मायकळे बोट दाखवलं ...तसा वसंता मायकळे धावत गेला. अन् चारकं फुटावरूनं बसंता माय ले निरखूनं पाह्यत होता. लुगळं घातलेली माय ऊन खात पटांगनात बसली होती. आता त्याची मायं अरधीही राह्यली नोव्हती. एकदम काळीवानी चवळीवानी बारीक झाली होती. त्याची मायं पार थकली होती. आंगाचं मास पार सैल झालं होतं. मानं गलगल हालत होती. विचारशुन्य नजरेनं थे गवताकळे पाह्यत होती. बसंताच्या डोयाले धारा लागल्या होत्या. थो धाय मोकलूनं लळाले लागला होता. कौसल्याचे कानं ही कमजोर पळले होते. तीले वसंताचे हुंदके आयकू येत नव्हते. बसंतानं अस्तनीनं आसू पुसले. आंगात बळ अन् कायजात हिंमत आनूनं माय जौळ गेला.....अन् मायचे पाय धरूनं म्हनला... मा....ओ मा.....मा व व माव...

अस म्हनत बसंता माय जौळ जावूनं त्यानं तीचे दोन्ही हात धरले. लय वरीष झाले वृध्दाश्रमात असल्यानं अन् डोयात मोतीबिंदू झाल्यानं कौशल्याले झावर झावर दिसत होतं. कौसल्यानं म्हतलं... कोनं व्हय बापा माह्ये पाय धरता. हात धरता. मान हालवत कौशल्या बोलली. मा मले नाही वयखलं काय व ....मी तुह्या पोरगा हावं ना व बसंता..आता कौसल्याच्या बोलन्यात अन् तोंडावर राग दिसतं होता. अन् तीनं रागारागानं म्हतलं... मले पोरगा हायं ऽऽऽऽ नाही ऽऽऽनाही ऽऽ मी त वांझोटी हावं. वांझोट्या बाईले कवा लेकरं असतात काय? मा अशी कामूनं बोलतं व मी तुह्या पोरगा हावं ना व बसंता...तुह्या कुशीतचं त जल्म झाला व मया. अशी नोको ना व बोलू मा. ज्या दिवशी तुह्या अन् तुह्या बायकोनं आम्हाले ह्या वृध्दाश्रमात टाकलं थ्या दिवसापासूनंच तू आम्हाले मेला. आम्ही दोघही वांझोटे म्हनूनसन्या जगलो आतापावतर.

ओ मा असं नोको ना व म्हनू...मले माफ कर. तुह्या अन् बाबानं माह्या शिक्षणासाठी किती कष्ट ऊपसले मले माईत हायं व मा...चल घरी चल आपल्या. अन् बाबा कुठीसा हायेत व मा. दिसूनं नाह्यी राह्यले. कौसल्यानं डोयाले पदर लावतं वर अभायाकळे हुंदका फोळत बोट दाखवलं... जस त्याच्या मायनं वर बोट दाखवलं तस बसंताच्या कायजावर अभाय कोसयल्या सारखं झालं...अन् बसंता ओक्साबोक्सी लळाले लागला...अन् कौसल्याचं तोंड चालू झालं... लहानपनी लय लाळ करे रे तुह्या बा तुले. तुले लागलं सवरलं थे आनूनं दे...माती तुह्या पायाले लागू नोयं म्हनूनसन्या तुले खांद्यावर घे. बजारात फिरवे. सोता मातरं फाटकं धोतरं अन् बांडीस घाले पन् तुले नये नये कपळे दर तीन मयन्यानं घे...एका दिवशी तुह्या पायात काटा गेला त तुह्या बा न बजारालोग रस्ता झाळूनं काहाळला. आम्ही तुले पयले पोटभर खावू घालो अन् मंग ऊरलं त भाकर खावो . कवा कवात आम्ही ऊपाशीचं निजो. पन् मा मले कामूनं नाही सांगलं वं बा गेले म्हनूनसन्या. तुले वृध्दाश्रमातूनं दा खेप फोनं लावले होते. पन् तुह्या बायकोनंच म्हतलं होतं. वृध्दाश्रम चालोना-यायले तुम्हीच ऊरकूनं घ्या. काय पैसा अदला लागते त धाळूनं देवू...मंग काय अथुल्याचं लोकायनं सार केलं. मरतानी तुह्या बा तुही आठोन काहाळत होता. तुह्यं नाव घेत होता रे.

फोन केला होता तरी थ्या ललितानं मले सांगलं नाही. मा चल आपल्या घरी. ईतले वरीष काहाळले अखीनं एक दोन अतिसाचं काहाळू दे. आता हेच माह्य घर अन् हेच माह्ये सोयरे. मा चलनं व घरी. कोनत्या घरी? ज्या घरातूनं तुह्या आम्हाले कुत-यासारखं हाकललं...ज्या घरात आम्हाले राची जागा नोव्हती. ज्या घरात अरधी भाकर भारी झाली होती. ज्या घरात आमच्या खोकलन्याचा अवाज पाह्यजे नोव्हता. ज्या घरात आम्च हागनं अन् बेळके नकोसे होते. ज्या घराच्या भिती आम्हाले कियसवान्या नजरेनं पाह्यत होत्या. थ्या घरात चल म्हनतं तू...... नाही बिलकूल नाही येनारं मी. तुह्या बा ले वचनं देयेलं हायं. जाय बाबू जाय तुलेही पोरगं हायं हे ध्यानात ठेवं आता.

वसंता मायले लळत लळत मनवत होता . हातापाया पळत होता. पन् तीन एक नाही आयकली. वसंता ऊठला सारं आंग त्याच ढिल्ल झालं होतं. मायच्या लळतचं पाया पळ्ळा. गाडीले सेल्फ मारूनं थो घरी आला . त्याचा पळलेला चेहरा पाहून. ललिता त्याले ईचारपूस कराले लागली. काय झालं हो..काह्यी दुखते काय.? वसंतानं रडक्या अवाजात डाव्या छातीच्या भागावर बोट ठेवूनं म्हतलं.

हावं अतिसा दुखते.

थांबा मी बाम चोळूनं देतो.

ललिता बांबीची डबी घेवूनं वसंताच्या शरटाची गुंड्या काहाळाले लागली...

दूर होयं माह्या नजरेपासूनं. तुह्यामुळे म्या माह्ये ईठ्ठल रूकमयी सारखे मायबाप वृध्दाश्रमात धाळले. किती आठवनं येत होती तेयले माह्यी. ऊन्हात पाय जवू नोय म्हनूनसन्या बा मले खांद्यावर बसवाचे अन आखरीले मीच खांदा देवू शकलो नाही. सोता ऊसाचा रस पेत नसूनं मले ऊसाचा रस ऊधारीपाधारीत पाजना-या बापाले आखरीच्या टायमाले मी मांडीवर घेऊन पानी पाजू शकलो नाही. रगताचं पानीपानी करूनं मले जेयनं शिकोलं मोठ केलं. पायावर ऊभ केलं. तेयची म्हतारपनात मी काळी होवू शकलो नाही. मले पोटभर खावू घालूनं सोताच्या पोटाले चिंधूक बांधना-या मायबापाले मी पोटभर खावू घालू शकलो नाही. गयनारं घर जागोजागी टपरं लावनारी मायं मले कोळळ्या जागेत निजवूनं सोता मातरं सरदयल्या जागेत गोन्ट टाकूनं निजे तीले मी ह्या बंगल्यात राहू देल्लं नाही. मेहनतीनं गयनारा तेयचा घाम नोव्हता रगत होतं मी पानी समजलो रे देवा...फाटक्या कपळ्यातच धन्यता माननारा बा मले नये कपळे घेवूनं देतानी हरके...थे काय होतं. थेच खरं प्रेम होतं. दिवसभर ढोरकाम करूनं रातभर कहन्नारा बाप मी ईसरलो कसा. बस्स झालं. तुह्या मायबापाले तू साजरं पाह्यत अन् मले मातरं माह्ये मायबाप वृध्दाश्रमात धाळाले लावले....सारं काही सरलं....हे देवा! बसंतानं बायकोले म्हतलं...तुह्या माह्या संबंध आजपासून सरला. बाप गेल्याचं तुह्या मले सांगीतल नाह्यी. बायको व्हय काय दुस्मानिन माह्यी. चल आता ऊद्या पायटीचं चालती व्हय अतूनं. आपले कायमचे संबंध टुटले समज.

बसंता जीवाचा तळतळात करूनं ऊपाशीचं निजला. दुस-या दिवशी नरेंद्र अन् विरेन्द्र ची तारीक होती. काय निकालं द्याव म्हणून वसंता ईचार करत होता. दोघही भाऊ आले. तेयचे वकील ही आले. केसची सुनावणी चालू झाली. दोघही भाऊ आपापली बाजू मांडत होते. आखरीले वसंतानं निकाल सादर केला. तुमचे माय बाप धन्य हायेत. आणि तुम्ही खरचं खुपचं पुन्यवानं आहात. तुम्ही खरे पुंडलिक आहात. तुम्हाले मायबापाची सेवा करने आवडते. कुणाच्या बाजूनं निकालं द्यावा खरचं कठीनं आहे. पन् सर्व बाजूनं ईचार करता. न्यायालय ह्या ईचारावर पोहचलं हायं की,

मोठे भाऊ नरेंद्र हे वयोवृद्ध झाले असूनं तेयचा अन् तेयच्या मायबापाच्या वयाचा ईचार करता मायबापाने आणि नरेंद्र याने लहान भावाकडे रहावे असा निकालं न्यायालय देत आहे. आणि हे केस निकालात काढण्यात येत आहे.

**– सु. पुं. अढाऊकर**
अकोला
मो. ९७६९२०२५९७

# जीवन सम्राट माधवराव पाटील शेळगावकर

उतुंग वैचारिक वैभव असणाऱ्या जीवन सम्राटाचा आज गौरव समारंभ संपन्न होत आहे. वादळाच्या वस्तीत वावरतानाही स्वतःच्या दिव्य तेजाला सतत शेतकऱ्यांच्या हितासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या कर्मयोगाच्या पराक्रमाचा जीवनगौरव करणे हे समाजाचे कर्तव्य आहे. क्षितिजांनाही गवसणी घालून स्वतःच्या कर्तव्याच्या कक्षा विस्तारित करत बळीराजाच्या समस्याशी एकरूप होऊन शेतकरी व शेती क्रांतीसाठी शेतकरी संघटनेत आयुष्य झोकून दिलेल्या स्वच्छतादूताचा जीवन प्रवास थक्क करणारा आहे. समाजहिताच्या कार्यासाठी त्यांचं मन सतत प्रसन्न असतं.

मी व्यथांची वेधशाळा, मी नवीचा मेघ काढा वाळवंटा समजून घेतो, मीच उद्याचा पावसाळा या काव्यपंक्ती सार्थक करणारा विश्वासक व आश्वासक जीवन प्रवासाचे माधवराव शेळगावकर हे आद्य मानकरी आहेत. शेळगाव गोरी या अत्यंत छोट्या गावात जन्मलेला हा मोठा माणूस आहे. स्वतःच्या गावात ग्रामस्वराज्याची विजयी पताका फडकून संपूर्ण महाराष्ट्रात स्वच्छतेची कावड खांद्यावर घेऊन अवघाची संसार सुखाचा करीन आनंदी भरीन तिन्ही लोकी या संत वचनाने प्रभावित व प्रेरित झालेला हा आनंद यात्री अजूनही अतिव आनंदाने जीवन यात्रा करत आहेत.

शेळगावच्या सरपंचपदी विराजमान झाल्यावर सरपंच कसा असावा याचा महाराष्ट्राला आदर्श घालून दिला. गल्लीपासून दिल्लीपर्यंत त्यांच्या उतुंग अशा कर्तत्वाचे दीपस्तंभ आम्हास आजही पहावयास मिळतात. शेळगाव गौरी, राळेगणसिद्धी पाटोदा हिवरे बाजार ही महाराष्ट्राची चार धाम आहेत. महाराष्ट्रातल्या प्रत्येक सरपंचांनी या चारीधाम त्यांच्या सहकार्यासह आवर्जून एकदा तरी भेट दिली पाहिजे. ग्रामस्वराज्याची त्यांनी केलेली मांडणी उघड्या डोळ्यांनी पाहून त्यांची प्रेरणा घेतली पाहिजे. महाराष्ट्राच्या ग्राम स्वराज्याचा व ग्राम स्वच्छतेचा जेव्हा इतिहास लिहिला जाईल तेव्हा माधवराव व त्यांचे शेळगाव यांची सुवर्ण अक्षरात नोंद झाल्याशिवाय राहणार नाही.



राजकारण, समाजकारण, समता, न्याय, बंधुता या सर्व कल्पनांना मानव कल्याणासाठी मानसात रुजवावे लागतील असेच ते नेहमी सांगत असतात. लौकिक अर्थाने राजकारणात त्यांना अपेक्षित यश मिळालं नाही हे त्यांचं नसून समाजाचे दुर्दैव आहे हा या समाजाचा नैतिक व वैचारिक पराभव आहे. शेतकरी नेते शरद जोशी व माधवराव पाटील शेळगावकर हे फक्त नावं वेगळी दिसतात त्या दोघांचाही आत्मा एकात्म झाला होता अशा अलौकिक समाजहितेशींना समाजाने खरंतर अत्यंत सन्मानानं सिंहासनावर बसवलं असतं तर ते सिंहासनही शोभून दिसलं असतं. दुर्दैवाने ते भारत देशात घडत नाही हे या देशाचे दुर्दैव आहे.

बहुजनभूषण, कर्मयोगी, झुंजार योद्धा, जननायक, लोकनेता, समाजहितेशी, मुलुख मैदानी तोफ, कर्तव्याचा दीपस्तंभ, शोषितांचा आवाज, शेतकरीपुत्र, गरिबांचा मित्र, जनहिताचा कैवारी, शब्दप्रभू, प्रभावी वक्ता, प्रतिभा संपन्न व्यक्ती, वैचारिक वादळ, शेतकरी क्रांतीचे प्रभावी सेनापती, जनआंदोलनाचे नायक, स्वच्छतेचा राजहंस, संस्कृती संवर्धक, पुरोगामी पुरुषोत्तम, क्रांतीसूर्य या व अशा अनेक उपाध्यांनी त्यांचा गौरव व्हावा या उंचीचा हा गौरवशाली समाजसुधारक आहे. या सर्व उपाध्याय हेच त्यांचं वैभव आहे. याच वैभवाचा आज गौरव आहे. अशा समाजसेवकांना जपणं त्यांच्या कार्याप्रतिक कृतज्ञता व्यक्त करणे हे आम्हा सर्वांचं समाज कर्तव्य आहे. त्यांनी निर्माण केलेल्या तसेच जपलेल्या सर्व परंपरांचा पाईक होण्याची पात्रता समाजाच्या अंगी यावी म्हणून सर्वांनी प्रयत्नशील राहणं हीच देशाप्रती सेवाभाव व्यक्त करण्यासाठी व भारत माझा देश आहे आणि या देशावर माझे प्रेम आहे हे सिद्ध करण्याची वेळ आहे.

तुमची तृष्णा, तुमची भूक, तुम्हाला रोज नवे स्वप्न देऊन जगवते आणि तुमच्यामुळे ती सर्वांना जागवतेही. तुमच्या जगण्याचे सर्व संदर्भ पुढे पडत असलेल्या तुमच्या कर्तत्वसंपन्न पावलांच्या ठशावरून अगदी ठळकपणे ओळखता येतील आणि तुमच्या कार्याचे शिलालेख भविष्यातही विचाराचे व विकासाचे दीपस्तंभ म्हणून समाजात दिमाखाने उभे राहतील याची साक्ष तुमचा वर्तमानच देत आहे.

मला माहीत आहे तुम्हाला लंगड्याचा पाय, शेतकऱ्यांची माय, अपंगांचा आणि गरिबाचा प्राण व्हावं वाटतं. आयुष्यभर क्रांतीची मशाल तुमच्या हातात शोधून दिसते. चंद्र, चांदण्याच्या प्रकाशात झुलण्यापेक्षा सूर्य कमी घेऊन ताठरपणे तुडवीत चालावे, वाटतात तुम्हाला तुमच्या विचाराने फुललेल्या निखाऱ्यांचे असंख्य ढीग अग्नी पुष्पाच्या विजयी मळा स्वतःच्या गळ्यात घालून.

सिंहासनावर बसलेल्या तथाकथित गांडूळापेक्षा घाम गाळून भाकरीत चंद्र पाहणाऱ्या मायबापांना मुजरा करताना तुम्हाला खरा आनंद होतो याचा मी अनेकदा अनुभव घेतलेला आहे. समाजसेवा व स्वाभिमान आणि समाजाप्रती कर्तव्य हेच तुमच्या अलंकार आणि तुमचे खरे वैभव आहे. तुमच्या भुकेचा धर्म वेगळा, तुमच्या इच्छेचा मर्म वेगळा, तुमच्या डोळ्यातही दृष्टी वेगळी आणि तुमच्या कल्पनेतली सृष्टीही वेगळी, खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे याचे धडे गिरवत गिरवत तुम्ही प्रगतीच्या क्षितिजाची पर्यटन आयुष्यभर केले. आयुष्याच्या प्रवासात प्रयोजनाचे सुस्पष्ट आराखडे तुमच्याकडे तयार होते आणि अजूनही आहेत याची आम्हांस जाणीव आहे. आदरणीय माधवरावजी तुम्ही एक विस्तीर्ण झाड आहात. तुम्हाला सर करायचा प्रयत्न केल्यावर कळते की तुम्ही तर एक अजिंक्य पहाड आहात. अनाथांना पुरवाळून दीनदुबळ्यांना जवळ घेऊन आणि वेळच पडली तर वादळालाही मुठीत घेऊन विचारपीठावर ती शब्दांचा ज्वालामुखी पेटवणारे तुम्ही शब्दप्रभू आहात हे या महाराष्ट्राने अनेक वर्ष अनुभवले आहे.

हक्काची भीक मागण्याऐवजी विचारांच्या बळावर बीज निक्रेस्टची मातीतच दोष आहे याचा शोध घेऊन एक परिवर्तनाची पेरणी करणारे तुम्ही शेतकरी आहात, बुद्धीचे वैभव हेच तुमचे साधन, प्रगती हाच तुमचा ध्यास, प्रयत्नांची पराकाष्ठा हीच तुमची प्यास आणि झोपडीतही सूर्य उगवेल हेच तुमचे मनसुबे मनापासून पूर्ण करण्याची जिद्द तुमच्यासमोर आम्हाला आनंदाने नतमस्तक व्हायला भाग पाडते. पावसात भिजवण्यापेक्षा उन्हातच नाव्हून निघणारे, इतरांना जाळण्यापेक्षा स्वतःच वनवा होऊन पेटून उठणारे आणि काळजातच घर करून बाणासारखं निघून जाणारे तुम्ही अनभिषिक्त सम्राट आहात. माधवराव अंधश्रद्धेवर हल्ला अस्वच्छता व अज्ञानावर प्रहार करून पुरोगामी चळवळीच्या महामार्गावर विजय घोडदौड करणारे ऊर्जेचे माहेरघर आहात. तुम्ही वंचिताच्या पंखांना बळ देऊन आसमंती बिहार करत करत अचूकपणे लक्ष वेधणारे तुम्ही लक्षवेधी योगी आहात. स्वतःचा जीवनपट स्वतःच्या बळावर समाजरूप युक्त पटकथांनी भरभरून लिहिणारे विधान आहात. तुम्ही म्हणूनच तर म्हणतोय अगदी विश्वासाने बहुजनांच्या संविधान आहात तुम्ही.

सहज जीवनावर विश्वास ठेवून विज्ञाननिष्ठा जीवन जगणाऱ्या या सेवाभावी आयुष्याचा प्रचंड आवाका असणाऱ्या पुरुषोत्तमास तथा शिक्षणातून क्रांती होते या विचारावर विश्वास ठेवून आयुष्य देखणे करणाऱ्या शेतकऱ्यांच्या सुपुत्रास आयुष्याच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देणाऱ्या लढवय्या नेत्यास माणुसकीचा धनी म्हणून जगणाऱ्या या कर्तव्यपरायण व्यक्तिमत्वास आयुष्यभर जीवनमूल्य जपून आपल्या अस्तित्वाचे संपूर्ण महाराष्ट्रात शेती, सहकार व स्वच्छतेचे वैभव निर्माण करणाऱ्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाचे धनी जीवन सम्राट माधवरावांना निरोगी जीवनाच्या शुभेच्छासह मानाचा मुजरा.


**–एकनाथ (अनिल) मोरे**
मा. सहसचिव ग्रामविकास व पंचायत राज
मंत्रालय महाराष्ट्र
तथा
संस्थापक अध्यक्ष, लक्षवेध फाउंडेशन,
नांदेड.

# योगीराज जननेता : माधवराव पाटील शेळगावकर

मराठा सेवा संघाचे काम करताना माझा सर्वच समाजातील अनेक थोर विचारवंत तसेच परिवर्तनवादी, बहुजनवादी, शेतकरीहितवादी, समाजकैवारी असलेल्या वर्तमानातील महामानवांचा अगदी जवळून संबंध आला आहे. ह्या ज्ञानवंतांनी व प्रबोधनकारांनी माझ्यावर मनापासून निरपेक्ष प्रेम केले, मला पाठबळ दिले, माझ्या विनंतीला मान देऊन महाराष्ट्रात व देशात व्याख्यान व मार्गदर्शन करण्यासाठी कृतीशील सहभाग दिला. अशाच एका निस्वार्थी, मानवतावादी, बहुजनवादी, पुरोगामी व महत्त्वाचे म्हणजे शेतकऱ्यांचे कैवारी असलेल्या आदरणीय शिवश्री माधवराव पाटील शेळगावकर ह्या जननेत्याबाबत मी आज कृतज्ञतापूर्वक व्यक्त होत आहे.

जून १९९२ मध्ये मी अकोला येथून सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड येथे कार्यकारी अभियंता पदावर बदलून आलो होतो. माझ्या नेहमीच्या सवयीप्रमाणे मी सर्वप्रथम जिल्हा प्रशासकीय अधिकाऱ्यांना भेटून ओळखी करून घेतल्या. नंतर सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांना भेटलो. त्यावेळी पालकमंत्री भास्करराव पाटील खतगावकर, आ. डॉ. माधवराव पाटील किन्हाळकर व आमदार डॉ. डी. आर. देशमुख हे माझे थोडेफार पूर्वपरिचित होते. सूर्यकांताताई पाटील व केशवराव धोंडगे यांच्या धडाकेबाज व्यक्तिमत्त्वाचे मला आकर्षण होते, त्यांची सदिच्छा भेट घेतली. स्थानिक क्षेत्रातील मान्यवर व्यंकटराव पाटील गोजेगावकर, मोहन पाटील टाकळीकर, भगवान पाटील आलेगावकर यांच्या भेटी झाल्या. याच दरम्यान सर्वच ठिकाणी मला माधवराव पाटील शेळगावकर यांची भेट घेण्यासाठी सूचना केली गेली होती. त्यांच्या बाबतीत अत्यंत अभिमानास्पद व गौरवपूर्ण उल्लेख असणारी माहिती मिळत गेली.

शैक्षणिक, राजकीय, सामाजिक व सहकार क्षेत्रातील निस्वार्थी व्यक्तिमत्त्व असल्याचे सांगितले. महाराष्ट्रातील एक तळमळीची सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचे प्रबोधनकार असल्याचे समजले. परंतु काही कारणाने आमची भेट होत नव्हती. शासकीय काम सांभाळून मी मराठा सेवा संघाच्या कामात बराच व्यस्त होतो. पावसाळा सुरू झाला होता. काही रस्त्यांची कामे सुरू होती. मराठा सेवा संघाचे दुसरे अधिवेशन १ सप्टेंबर १९९२ रोजी नांदेड येथे आयोजित करण्याचे ठरविले होते. या कारणाने कार्यक्रम पत्रिका तयार करणे, पाहुणे व व्याख्याते निवडून आमंत्रण देणे, प्रचार-प्रसार प्रसिध्दी करणे, प्रत्यक्ष गाठीभेटी घेणे चालू होते. मराठा सेवा संघ नांदेड जिल्हा कार्यकारिणी गठीत झाली होती. सर्वानुमते नांदेड जिल्ह्यातील गणमान्य व्यक्ती आदरणीय माधवराव पाटील शेळगावकर यांना भेटून चर्चा करून मार्गदर्शन घेण्याचे ठरले, आणि एकेदिवशी मी मराठा सेवा संघाचे स्थानिक सहकारी डॉ. नागोराव शिंदे व व्यंकटराव आढाव यांना सोबत घेऊन शिवश्री माधवराव पाटील शेळगावकर यांच्या नांदेड येथील घरी भेटीसाठी गेलो. मराठवाड्यातील खानदानी मराठा पाटील पद्धतीने आमचे भरगच्च स्वागत झाले. आपसात परिचय झाला. मराठा सेवा संघाच्या द्वितीय वार्षिक अधिवेशनाची माहिती दिली व उपस्थित राहून मार्गदर्शन करण्याची विनंती केली. मराठा सेवा संघाचे नाव व काम त्यांनी ऐकलेले होते. माधवराव पाटील यांच्यासाठी मराठा समाज परिवर्तन व विकास हा जिव्हाळ्याचा तसेच चिंतनाचा विषय होता, हे लक्षात आले. ते उत्साहाने व तळमळीने भरभरून बोलत होते.



बाहेर पडून गाडीत बसल्यावर बराच वेळ आम्ही फक्त माधवराव पाटील शेळगावकर यांच्या व्यक्तिमत्व व कामाबाबतच बोलत होतो. मी स्वतः माधवराव पाटील यांचा एकंदरीत स्वभाव, बोलण्याची ढब, सहजभाव व व्यक्तिमत्व यामुळे पहिल्याच भेटीत पूर्णपणे प्रभावित झालो होतो, पूर्ण भारावून गेलो होतो. अगदी माधवराव पाटीलमय झालो होतो. पहिल्या भेटीतच त्यांच्या पूर्ण प्रेमात पडलो. मला सांगताना अभिमान वाटतो की, आजही सुमारे ३२ वर्षानंतर माझ्या मनात शिवश्री माधवराव पाटील शेळगावकर यांच्या बाबतीत असलेला आदर व प्रेम दिवसेंदिवस वाढतच आहे. समक्ष भेटी कमी झाल्या तरी मोबाईलवरून संवाद-संपर्क असतोच. त्यांच्यावर लिहिण्याची संधी मिळाली ही माझ्यासाठी गौरवशाली बाब आहे.

शेतकरी कुटुंबातील दुःख दारिद्र्यव्यथा, कौटुंबिक, आर्थिक ओढाताण व शेवटी आत्महत्येचा विचार, ही शेतकऱ्यांची जीवनयात्रा रेखाटताना माधवराव पाटील यांनी नामांकित कवी, साहित्यिक यांच्यावर मात केली होती. संत गाडगेबाबा यांच्या कीर्तनाची आठवण यावी अशा पद्धतीने माधवराव पाटील यांचे भाषण ऐकणाऱ्यांच्या काळजाला जाऊन मिळते. विविध ठिकाणी त्यांनी व्याख्यानातून शब्दांकित केलेले शेतकरी जीवन जर पुस्तक रूपाने प्रकाशित केले असते तर कदाचित साहित्य अकादमीचा पुरस्कारही ते सहज मिळू शकले असते, एवढी प्रभावी भाषा व मांडणी त्यांनी केली आहे. तरीही त्यांना वेगवेगळ्या शेकडो संस्थांनी सन्मानित करून पुरस्कार दिले आहेत. नांदेड जिल्ह्यातील चरित्रकारांनी खरे तर उत्स्फुर्तपणे व कृतज्ञभावनेने माधवराव पाटील यांचे चरित्र लिहायला हरकत नव्हती किंवा त्यांच्या जीवनातील काही निवडक प्रसंग रंगवून एखादी ग्रामीण भागातील जीवन सुखमय होण्यासाठी धडपड करणारा चरित्रनायक मध्यवर्ती ठेवून कादंबरी लिहिणे शक्य होते. त्यांनी केलेल्या संघर्षाची कहाणी एखाद्या चित्रपटाची कथा होऊ शकते, परंतु दुर्दैवाने आपल्याला जवळची मोठी माणसं ओळखता येत नाहीत किंवा अशी माणसे जिवंत असेपर्यंत आम्हाला त्यांचे महान, कार्य व योगदान समजत नाही. यावरूनच अज्ञान व अहंकार यामुळे मराठा समाज व्यवहारी जीवन जगत आहे असे आमच्या लक्षात आले. मराठा सेवा संघाला अपेक्षित कार्याची व विचारांची दिशा आम्हाला माधवराव पाटील यांच्या भाषणातून मिळाली होती हे कृतज्ञतापूर्वक व्यक्त करतो. याच अधिवेशनात मराठा सेवा संघ अंतर्गत कृषी परिषद व अन्य सतरा कक्ष निर्माण करण्याचे ठरविले होते.

शेतकऱ्यांनी शाश्वत शेती कशी करावी यासाठी शिबिरे आयोजित केली. स्वतः कृषी विद्यापीठ व अन्य ठिकाणी भेटी दिल्या. आपुलिया हिताशी असे जो जागता, धन्य मातापिता तयांच्या...या जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या उक्तीनुसार माधवराव पाटील यांनी समाजसेवा करत असताना वैयक्तिक व कौटुंबिक जीवनाकडे कानाडोळा होऊ दिला नाही. महिलांच्या सन्मानाबाबत आग्रह धरताना त्यांची सुरुवात आपल्या कुटुंबातील महिलांना स्वातंत्र्य व सन्मान देऊन केली. आधी केले मग सांगितले, या विचारानुसार कुटुंबातील मुलांना उच्च शिक्षण देऊन आवडीच्या व्यवसायात आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी प्रोत्साहन दिले व शेतीवरील बोजा कमी केला. नांदेड, हैदराबाद, पुणे, मुंबई यासारख्या शहरात राहून देखील ग्रामीण भागात कायमस्वरूपी संपर्क ठेवला आहे. कुळी कन्या पुत्र होती जे सात्विक, तयांचा हरिक वाटे जीवा या उक्तीप्रमाणे सर्वसामान्यांचा आधार असलेल्या महान परिवर्तनकाराचा गौरव कौटुंबिक व सामाजिक पातळीवर होत आहे ही बाब अत्यंत आनंददायी आहे. या निमित्ताने शिवश्री माधवराव पाटील शेळगावकर यांना दीर्घ, निरोगी सुखी, समृद्ध आयुष्य लाभो हीच जिजाऊ चरणी प्रार्थना, जय जिजाऊ.

**–पुरुषोत्तम खेडेकर**
संस्थापक अध्यक्ष मराठा सेवा संघ
मो. ९८२३६९३२२७

## थोडक्यात...

### प्रीती वाघमारे यांना इंग्रजी विषयात पीएच. डी.



**नांदेड (प्रतिनिधी)** – येथील प्रीती धोंडीबा वाघमारे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने इंग्रजी विषयात पीएच. डी. प्रदान केली. सोशल लिंग्विस्टिक स्टडी ऑफ सेकंड लँग्वेज एक्विजिशन ऑफ अंडर ग्रॅज्युएट कॉलेज स्टुडंट्स इन जळगाव डिस्ट्रिक्ट या विषयावर त्यांनी शोधप्रबंध सादर केला. प्र. डॉ. विनय भोगले यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी पीएच. डी. पूर्ण केली. महात्मा ज्योतिबा फुले सावित्रीमाई फुले, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून जिद्द व चिकाटीच्या जोरावर यश संपादन केल्यामुळे वडील प्रा. डी. के. वाघमारे व आई रंजना वाघमारे, पती प्रा. डॉ. वैजनाथ कांबळे, पत्रकार संभाजी कांबळे यांच्यासह समाजातील विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

### मेस्कोमध्ये सुरक्षा रक्षक पदासाठी भरती; माजी सैनिक, पाल्य व पत्नी/विधवांसाठी संधी

**नांदेड (प्रतिनिधी)** – मेस्को क्षेत्रीय कार्यालय, लातूर अंतर्गत बीड व नांदेड जिल्ह्यात सुरक्षा रक्षक पदांच्या अनेक जागा रिक्त आहेत. या पदांसाठी माजी सैनिक, माजी सैनिकांचे पाल्य तसेच माजी सैनिकांच्या पत्नी/विधवांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

बीड व नांदेड जिल्ह्यात सुरक्षा रक्षक पदासाठी इच्छुक असलेल्या पात्र उमेदवारांनी आपली नावे शुक्रवार, २७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, नांदेड यांच्याकडे सादर करावीत. तरी पात्र माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबियांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी किरण अंबेकर यांनी केले आहे.

# शिवरायांचे विचार कृतीत आणणे हाच शिवचरित्राचा खरा सन्मान - महावितरणचे संचालक राजेंद्र पवार

**नांदेड (प्रतिनिधी)** –छत्रपती शिवाजी महाराजांनी जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन केवळ गुणवत्तेच्या आधारावर स्वराज्याची निर्मिती केली. हे स्वराज्य खऱ्या अर्थाने रयतेचे एक आदर्श राज्य ठरले. या मातीचा आणि मातेचा सन्मान करणाऱ्या छत्रपती शिवाजी राजांचे विचार जिवंत ठेवण्यासाठीच शिवजयंती साजरी केली जाते. मानवी जीवनात प्रत्येकाने महाराजांचे हे उदात्त विचार आपल्या प्रत्यक्ष कृतीत आणि वाटचालीत अंगीकारले पाहिजेत, आणि तोच शिवचरित्राचा खरा सन्मान ठरेल, असे प्रतिपादन शिवचरित्र अभ्यासक तथा महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी केले.

नांदेड येथील महावितरण परिमंडलाच्या प्रांगणात शिवशंभू वीज प्रतिष्ठानच्या पुढाकाराने तसेच महावितरण व महापारेषण कर्मचाऱ्यांच्या संयुक्त सहकार्याने छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली. या सोहळ्याच्या अध्यक्षीय भाषणात संचालक पवार बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून महापारेषणचे संचालक (संचलन) सतीश चव्हाण उपस्थित होते.

पुढे बोलताना संचालक राजेंद्र पवार यांनी महाराजांच्या व्यवस्थापन कौशल्याचा गौरव



केला. ते म्हणाले की, शिवाजी महाराजांच्या राज्यात माणसाला आणि त्याच्या अंगी असलेल्या कर्तृत्वाला सर्वोच्च स्थान होते. त्यांनी सर्व जाती-धर्माच्या लोकांना एकत्र घेऊन स्वराज्य उभे केले. त्यामुळेच हे राज्य लोककल्याणकारी ठरले. उपलब्ध असलेल्या मानवी संसाधनांचे त्यांनी ज्या पद्धतीने नियोजन केले, त्यावरून ते एक उत्कृष्ट 'मॅनेजमेंट गुरु' असल्याचे सिद्ध होते. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून आपणही आपल्या कार्यक्षेत्रात नीतिमत्तेने काम करणे गरजेचे आहे.

याप्रसंगी उद्घाटक सतिश चव्हाण यांनी देखील शिवरायांच्या प्रशासकीय शिस्तीवर प्रकाश टाकला. महाराजांनी आपल्या कारभारात नीतिमूल्यांना दिलेले महत्त्वच त्यांच्या राज्याला आदर्श बनवते, असे त्यांनी आवर्जून नमूद केले. कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते प्रा. डॉ. निलेश चव्हाण यांनी आपल्या ओघवत्या शैलीत शिवचरित्र उलगडून दाखवले. जगाच्या इतिहासात अनेक राजांचे पराक्रम नोंदवले गेले असले, तरी सामान्य माणसांच्या काळजावर कोरला गेलेला इतिहास हा केवळ छत्रपती शिवाजी महाराजांचाच आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

या शिवजन्मोत्सव सोहळ्यास महापारेषणचे मुख्य अभियंता किशोर गरुड, पायाभूत आराखडा विभागाच्या अधीक्षक अभियंता श्रीमती निधी गौतम, मानव संसाधन विभागाचे सहायक महाव्यवस्थापक प्रदीप सातपुते, सुदर्शन कालेवाड, प्रभारी अधीक्षक अभियंता विनय घनबहादूर, सुरेंद्र मुंगारे, शिवशंभू प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेश वाघमारे यांच्यासह संयोजक पांडुरंग बोडके, संजय लोंढे आणि महावितरण व महापारेषणचे अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. व्याख्यानाच्या कार्यक्रमानंतर सादर झालेल्या शाहिरी आणि पोवाड्यांनी कार्यक्रमाची सांगता झाली. नांदेड परिमंडलाच्या प्रांगणात गुरुवारी शिवजयंती साजरी करण्यात आली. यावेळी वीज वितरण कंपनीचे अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मिशन आपुलकी अंतर्गत जिल्हा परिषद शाळेस गावकऱ्यांकडून साहित्य भेट




**बिलोली (प्रतिनिधी)** – बिलोली तालुक्यातील बेळकोणी खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत 'मिशन आपुलकी' उपक्रमांतर्गत गावकऱ्यांनी एकत्र येत शाळेस आवश्यक साहित्याची अमूल्य भेट दिली.

शासनाच्या प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना (शालेय पोषण आहार) अंतर्गत इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन दिले जाते. विद्यार्थ्यांचे कुपोषण कमी करणे, शाळेतील उपस्थिती वाढविणे आणि शाळाबाह्य गळती रोखणे हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या योजनेचा लाभ शाळेत नियमितपणे दिला जात असला तरी विद्यार्थ्यांसाठी जेवणाची ताटे व स्वयंपाकासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध नसल्याने अडचणी निर्माण होत होत्या. ही समस्या लक्षात घेऊन गावातील विश्वनाथ अडबलवार, दत्तात्रय कुलकर्णी, सुजित डोंगरे, सचिन अनमुलवाड, राजेंद्र गरकेवाड, शंकरराव रेड्डी, गणपत वाघमारे, प्रल्हाद कापावार, किशन मळेकरी, शंकर बाळके, राजेंद्र कापावार, प्रल्हाद बासरे, सज्जन बाळापुरे, दत्ता यारावाड, काशिनाथ रेड्डी, राजू शिळेकर, रामकिशन यरकलवाड, संदीप बाळके व ज्ञानेश्वर यरकलवाड यांनी पुढाकार घेत 'मिशन आपुलकी' अंतर्गत शाळेस १०० ताटे, टोपले, भातवाडी, बादल्या तसेच विद्यार्थ्यांसाठी आसनपट्ट्या असे एकूण दहा हजार रुपयांचे साहित्य भेट दिले.

गावकऱ्यांच्या या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांची दीर्घकाळाची अडचण दूर झाली असून, शाळेतील मध्यान्ह भोजन व्यवस्था अधिक सुलभ झाली आहे. शाळेच्या वतीने तसेच सर्व विद्यार्थ्यांच्या वतीने संबंधित सर्व दात्यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी गावकऱ्यांची साथ कायम राहावी, अशी अपेक्षा बेळकोणी येथील जि. प. च्या शाळा प्रशासनाने व्यक्त केली आहे.

# प्रा. सुग्राम पुल्ले स्मृती प्रतिष्ठानच्यावतीने व्याख्यान व पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन

## डॉ. संजय कळमकर यांचे व्याख्यान तर प्राचार्य डॉ. नागनाथ पाटील यांना साहित्य पुरस्कार

**नांदेड (प्रतिनिधी)** –प्रा. सुग्राम पुल्ले स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी समाज जीवनातील अत्यंत महत्वाच्या विषयावर 'प्रा. सुग्राम पुल्ले व्याख्यानमाला' आयोजित केली जाते. व्याख्यानमालेचे हे तिसरे वर्ष आहे. या व्याख्यानमालेत डॉ. राजशेखर सोलापुरे व डॉ. रामकृष्ण बदने यांनी आपले विचार मांडले. यावर्षी सुप्रसिद्ध साहित्यिक व व्याख्याते डॉ. संजय कळमकर, अहिल्यानगर यांचे 'जगण्यातील आनंदाच्या वाटा' या विषयावर व्याख्यान होणार आहे.

तसेच प्रा. सुग्राम पुल्ले स्मृती प्रतिष्ठान नांदेडच्यावतीने दरवर्षी उत्कृष्ट वाड्.मयनिर्मिती करणाऱ्या एका साहित्यिकाचा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. गतवर्षी हा पुरस्कार 'उसवण' या कादंबरीचे लेखक देवीदास सौदागर





यांना प्रदान करण्यात आला होता.

यावर्षीचा मराठी साहित्य विश्वातील हा अत्यंत महत्त्वाच्या 'प्रा. सुग्राम पुल्ले राज्यस्तरीय साहित्य पुरस्कारा'साठी डॉ. नागनाथ पाटील यांची निवड करण्यात आली आहे. डॉ. नागनाथ पाटील यांचे लंबाडी, कोंडणातलं जिणं, हुतराणी या कादंबऱ्या आणि रानभूल, मॅपको हे कथासंग्रह तर खोल डोहातल्या सावल्या, सावली हरवलेले झाड हे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. डॉ. नागनाथ पाटील यांना हा पुरस्कार (रोख रक्कम रु. ५००१/-, मानपत्र व शाल इ.) सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे.

हा सोहळा रविवार, दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता सायन्स कॉलेज नांदेड येथील स्व. पुरणमलजी लाहोटी सभागृहामध्ये होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. के. राजकुमार हे भूषविणार आहेत.

या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन प्रा. सुग्राम पुल्ले स्मृती प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ. मनीषा जितेंद्र पुल्ले, सचिव डॉ. जितेंद्र सुग्राम पुल्ले व संयोजन समितीचे प्रा. डॉ. कमलाकर चव्हाण, विजयकुमार बेंबडे, अनंत रेड्डी भुरकापल्ले, प्रा. डॉ. शिवसांब कापसे, लिंगराम हंडरगुळे, सुनील मुसने आदींनी केले.

# अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेश प्रशिक्षण

**नांदेड (प्रतिनिधी)** – महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना दहावीनंतर २ वर्षे कालावधीमध्ये नामवंत खाजगी प्रशिक्षण संस्थेच्या सहायाने शासकीय आश्रमशाळेमध्ये अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेश परीक्षांचे मार्गदर्शन करण्यात येणार असून, निवड केलेल्या आश्रमशाळेत प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

आदिवासी विकास विभागांतर्गत येत असलेल्या शासकीय/अनुदानित आश्रमशाळा व एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल व खाजगी तथा मान्यता माध्यमिक शाळा अंतर्गत इयत्ता ११ वी व इ. १२ वीमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेश परीक्षेची तयारी करुन घेण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविल्यास शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अभियांत्रिकी महाविद्यालय किंवा आयटीआयमधील अभ्यासक्रमांना जास्तीत जास्त मुलांना प्रवेश घेणे सोईस्कार शक्य होईल.

मुला-मुलींना प्रवेश द्यायची विद्यार्थी संख्या इयत्ता ११ वी सीईटी/ जेईई व नीटसाठी प्रत्येकी ५० एवढी आहे. त्यानुसार निवड केलेले केंद्र पुढीलप्रमाणे आहेत.

नाशिक अपर आयुक्त अंतर्गत आश्रमशाळा शा.आ.शा. बोपेगांव (नाशिक प्रकल्प) मुलांना प्रवेश द्यायची विद्यार्थी संख्या इयत्ता ११ वी सीईटी/जेईई- ५० व नीट - ५० एवढी आहे. ठाणे अपर आयुक्त अंतर्गत आश्रमशाळा शा.आ.शा. (शहापूर प्रकल्प) मुलींना प्रवेश द्यायची विद्यार्थी संख्या इयत्ता ११ वी सीईटी/ जेईई-५० व नीट-५० एवढी आहे. अमरावती अपर आयुक्त अंतर्गत आश्रमशाळा शा.आ.शा. गोटेवाडी (प्रकल्प कळमनुरी) मुलांना प्रवेश द्यायची विद्यार्थी संख्या इयत्ता ११ वी सीईटी/ जेईई- ५० व नीट - ५० एवढी आहे. नागपूर अपर आयुक्त अंतर्गत आश्रमशाळा शा.आ. शा. सिंधीविहीर (वर्धा प्रकल्प) मुलींना प्रवेश द्यायची विद्यार्थी संख्या इयत्ता ११ वी सीईटी/ जेईई- ५० व नीट - ५० एवढी आहे.

याप्रमाणे नमूद अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेश प्रशिक्षणाकरीता विद्यार्थ्यांची सर्वसाधारण पात्रता पुढीलप्रमाणे आहे. या योजनेचा लाभ घेण्याकरीता विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. अनुसूचित जमातीच्या यादीतील असावा व त्याकरिता प्रवेशावेळी जातीचा दाखला सादर करणे बंधनकारक आहे. विद्यार्थ्यांच्या पालकाचे उत्पन्न ८ लाख रुपये पेक्षा कमी असावे. या चाळणी परीक्षेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थी त्याच शैक्षणिक वर्षात १० उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. (सदरचा विद्यार्थी २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १० वी मध्ये प्रवेशित असावे.)

वरीलप्रमाणे या प्रकल्प कार्यालयांतर्गत सर्व शासकीय/अनुदानित आश्रमशाळा/ईएमआरएस निवासी शाळेतील अनुसूचित जमातीचे विद्यार्थी व नांदेड जिल्ह्यातील सर्व खाजगी तथा मान्यता प्राप्त माध्यमिक शाळेतील अनुसूचित जमातीचा विद्यार्थी असावे.

आवेदनपत्र विहित नमुन्यात व यादी संबंधित शाळेचे मुख्याध्यापक यांनी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, किनवट जि. नांदेड या कार्यालयात बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६ पूर्वी सादर करावेत. विहित नमुन्यात माहिती सादर केलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची चाळणी परीक्षा माहे मार्च २०२६ मध्ये या प्रकल्प कार्यालयाअंतर्गत एकूण प्राप्त आवेदनपत्रानुसार शासकीय आश्रमशाळेवर घेण्यात येणार आहे, असे आवाहन किनवटचे सहायक जिल्हाधिकारी तथा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पचे प्रकल्प अधिकारी जेनित चन्द्रा दोन्तुला यांनी केले आहे.

# शिवरायांची ऐतिहासिक पटलावरील भूमिका युगांतकारी -डॉ. शिवराम जाधव

## रासेयो शिबिरात 'जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर शिवचरित्राची प्रासंगिकता' विषयावर व्याख्यान

**नांदेड (प्रतिनिधी)** – शिवरायांचा जन्म ही केवळ ऐतिहासिक नव्हे, तर युगांतकारी घटना आहे. शिवराय नसते तर हिंदुस्थानचा इतिहास वेगळा असता आणि ते आणखी दहा वर्षे जगले असते, तरीही इतिहासाची दिशा बदलली असती. मात्र इतिहासात 'जर-तर'ला स्थान नसते, असे प्रतिपादन पीपल्स महाविद्यालयातील इतिहास विभागाचे प्रा. डॉ. शिवराम जाधव यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजना विशेष वार्षिक शिबिरात 'जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर शिवचरित्राची प्रासंगिकता' या विषयावर शिवजयंतीनिमित्त प्रमुख वक्ते म्हणून ते नेहरूनगर (ता. कंधार) येथे बोलत होते.

ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पस आणि ग्रामीण विज्ञान महाविद्यालय, विष्णुपुरी यांच्या



संयुक्त विद्यमाने शाश्वत विकासासाठी युवक : जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भूमी विकासावर विशेष भर या संकल्पनेवर आधारित विशेष शिबिराचे आयोजन दि. १५ ते २१ फेब्रुवारी दरम्यान करण्यात आले होते. शिवजयंतीनिमित्त विद्यार्थ्यांनी लेझीम पथकासह फेटे परिधान करून उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रम साजरा केला.

यावेळी मंचावर डॉ. सुनील कदम, रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. संदीप वडगावे, प्रा. अभय वाघमारे, प्रा. देवयानी कापसे, प्रा. कल्याणी कुलकर्णी आणि कुणाल चुकेवाड उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. जाधव म्हणाले की, जागतिक संदर्भात विचार केला असता छत्रपती शिवाजी महाराज यांचे राज्य आकाराने इतर सम्राटांच्या तुलनेत लहान होते. अनेक सम्राटांचे साम्राज्य अफाट होते, काहींचे युद्धकौशल्य अचाट होते; तरीही शिवरायांशी त्यांची तुलना होऊ शकत नाही. भूगोलाने मर्यादित असतानाही त्यांनी घडवलेला इतिहास व्यापक आणि प्रभावी आहे. त्यांच्या कार्यपद्धतीत, वैचारिक भूमिकेत आणि सुजाण राज्यकारभारातच त्यांच्या वैशिष्ट्याचे गूढ दडलेले आहे, असे त्यांनी नमूद केले. शिवरायांचे अति-दैवतीकरण समाजासाठी घातक ठरू शकते, अशी खंत व्यक्त करत त्यांनी सांगितले की, शिवरायांच्या व्यक्तिमत्त्वातून विद्यार्थ्यांनी निर्भीडपणा, चिकित्सक दृष्टी आणि व्यवस्थेला प्रश्न विचारण्याची वृत्ती आत्मसात केली पाहिजे. तेव्हाच शिवस्मरण सार्थकी लागेल.

शिवरायांचे राज्य हे खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचे राज्य होते. न्याय्य शेतसारा, पडीक जमिनी लागवडीखाली आणण्याचे प्रयत्न, तगाई कर्जव्यवस्था, सिंचन सुविधा अशा क्रांतिकारी उपाययोजनांतून त्यांनी स्वराज्यात कृषीक्रांती घडवून आणली. जनतेचे शोषण केवळ राजाकडूनच नव्हे, तर सरदार, सुभेदार आणि सावकारांकडूनही होत असल्याची जाणीव त्यांना होती. 'रयत सुखी, तर राजा सुखी' हे तत्त्व त्यांनी आचरले; म्हणूनच चार शतकांनंतरही ते लोकस्मृतीत अजरामर आहेत, असे डॉ. जाधव यांनी सांगितले.

# सिडको झोन अंतर्गत सर्व मस्जिद परिसरात नागरी सुविधा द्या - काँग्रेसची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)** – पवित्र रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर सिडको झोन अंतर्गत असलेल्या मनपा प्रभाग क्र. १९ व २० मधील सर्व मस्जिद परिसरात नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी सिडको ब्लॉक काँग्रेस अध्यक्ष बापूसाहेब पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आली. यावेळी परिसरातील मस्जिदीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पवित्र रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर मस्जिद परिसर स्वच्छ व प्रकाशमय असणे अपेक्षित आहे. मात्र पवित्र रमजान महिन्याला सुरवात होऊन देखील नागरी सुविधेच्या समस्याचे निवारण झाले नाही.



दरम्यान सिडको झोन अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्र. १९ मधील दोन व प्रभाग क्र. २० मधील तीन अशा पाच मस्जिदीच्या परिसरात स्वच्छतेसाठी दोन वेळा स्वच्छता कर्मचारी उपलब्ध करून देणे व प्रकाशासाठी फोकस लाईट बसविण्याची मागणी सिडको काँग्रेसच्या वतीने, सिडको झोन सहाय्यक आयुक्त यांच्याकडे शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी रोजी करण्यात आली. यावेळी सिडको वाघाळा ब्लॉक काँग्रेस अध्यक्ष बापूसाहेब पाटील यांच्यासह लतीफ शेख, मोईन शेख लाठकर, नरोद्दीन शेख, युसूफ शेख, कलीम शेख, गौस शेख आदी उपस्थित होते.

# एसटी विभागीय कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**नांदेड (प्रतिनिधी)** –महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) विभागीय कार्यालय नांदेड येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी १८ वर्षांपासूनची परंपरा कायम राखत रयतेचे राजे, बहुजन प्रतिपालक, कुळवाडीभूषण, महान योद्धे छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी सार्वजनिक जयंती गुरुवार, दि.१९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ठिक ११ वाजता एसटी कष्टकरी कामगार कर्मचाऱ्यांच्यावतीने मोठ्या हर्षोल्हासात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभाग नियंत्रक डॉ. चंद्रकांतराव वडसकर, हे होते तर विचारपीठावर आ. बालाजीराव कल्याणकर, माजी महापौर तथा नगरसेविका जयश्री निलेश पावडे, भाजपाचे महिला प्रदेश उपाध्यक्षा तथा माँ जिजाऊ साहेब महिला अर्बन बँकेच्या अध्यक्षा प्रणिताताई देवरे, नगरसेविका सरिता बिरकले, पंचायत समिती नांदेडचे माजी अध्यक्षा




संगीता विठ्ठलराव पाटील डक, भाग्यनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे, आरटीओ कार्यालयाचे दिलीपदादा गायकवाड, गिताई मजूर संस्थेचे अध्यक्ष मुन्ना कदम कोंढेकर, निखील चौधरी, बेंद्रीचे सरपंच सचिन पाटील बेंद्रीकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अल्पसंख्याक सेलचे नांदेड जिल्हाध्यक्ष ॲड. जमीर पठाण मालीपटेल, जिजाऊ महिला ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा सुरेखा पाटील रावणगावकर, सुरक्षा व दक्षता अधिकारी गोविंदराव मुळे, गणेश कदम, चार्जमन प्रभाकर मोरे, गुणवंत एच. मिसलवाड, रामदास पेंडकर, आनंद कदम कोंडेकर, वाहतूक नियंत्रक सुनिल मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सर्वप्रथम उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मान्यवरांचा संयोजन समितीच्यावतीने नंदू पाटील बेंद्रीकर, अभिषेक भाऊ ताकझुरे, बाळू पेंटेवाड, गजानन टोणगे, आम्रपाली शेळकीकर, गुणवंत एच. मिसलवाड, वैशाली गोदमवाड यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचा शाल, पुष्पहार देवून सत्कार केला.

# 'जोखीम' चे दुसरे नाव म्हणजे युगप्रवर्तक छत्रपती शिवाजी महाराज -डॉ. बालाजी चिरडे

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – काळाला कलाटणी देणारा, अन्याय अत्याचाराविरोधात आवाज उठवणारा, परंपरागत संकेत उधळून लावणारा आणि आपल्या जीवाची पर्वा न करता येथील रयतेसाठी जोखीम पत्करून आपल्याला स्वराज्य बहाल करणारा युगप्रवर्तक म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध व्याख्याते व महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ वर्धा येथील इतिहासाचे गाढे अभ्यासक डॉ. बालाजी चिरडे यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, विद्यार्थी विकास विभाग व श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचालित, इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय सिडको, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महात्मा गांधी व्याख्यानमाला युगप्रवर्तक छत्रपती शिवाजी महाराजः काळ आणि कर्तृत्व या विषयावर ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे, समन्वयक डॉ. जी. एस. पाटील यांची उपस्थिती होती.

यावेळी डॉ. चिरडे म्हणाले की, युगप्रवर्तक याचा अर्थ काळाला कलाटणी देणारे व्यक्तिमत्त्व. युगप्रवर्तक होण्यासाठी त्यांचं कर्तृत्व महत्त्वाचे ठरते. काळाच्या, प्रवाहाच्या विरोधात जो व्यक्ती लढा देतो तेव्हा तो युगप्रवर्तक ठरतो.



आपल्या काळातील सर्व संकेत उधळून लावतो, तेव्हा व्यक्ती सुपरमॅन ठरतो. या पार्श्वभूमीवर छत्रपती शिवाजी महाराज तंतोतंत उतरतात. सत्तेच्या विरोधात लढण्याची कुवत सामान्य माणसात नसते. पण छत्रपती शिवाजी महाराज या व्यवस्थेच्या विरोधात पाय रोवून उभे राहिले. रविंद्रनाथ टागोर यांनी आपल्या कवितेत छत्रपती शिवाजी महाराजांना 'युग द्रष्टा' म्हटले आहे. नेपोलियन हा फ्रान्सचा शिवाजी होता. थोडक्यात छत्रपती शिवाजी महाराज हे फक्त नाव नाही तर ते अन्याय, अत्याचाराच्या विरोधात लढणारे, व्यवस्थेला तडा देणारे व स्वतःची ओळख निर्माण करणारे जे असतात त्यांना दिलेले हे एक नाव आहे. औरंगजेब असामान्य व्यक्ती होते. एक हजार अफजलखान मृत्यू पावल्यानंतर एक औरंगजेब जन्माला येतो. अशा असामान्य व्यक्तीच्या विरोधात लढण्यासाठीही असामान्य ताकद लागते. ती ताकद छत्रपती शिवाजी महाराज यांच्याकडे होती म्हणून ते युगप्रवर्तक आहेत. अफजलखान भेट, सिद्दी जौहर लढा, शायस्तखान फजिती, सुरत लूट, मिर्झाराजे जयसिंग सोबतचा तह, आग्र्याहून सुटका, छत्रपती शिवाजी राजांचा राज्याभिषेक, राजमुद्रा हे फक्त केवळ घटना नाहीत तर युगप्रवर्तकचे निकष आहेत. थोडक्यात जोखीमचे दुसरे नाव म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज असे ते शेवटी म्हणाले.

अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे म्हणाले की, युगप्रवर्तक म्हणजे युगाला वळण देणारा, मार्ग, दिशा देणारा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी काळाच्या पुढे जाऊन जे कर्तृत्व केले ते आजही आपल्यासाठी प्रेरणादायी आहे. आज केवळ गौरवीकरण न करता दररोज त्यांचे विचार आपल्यात रूजवले तरच आपल्याला भविष्य आहे. ज्येष्ठ साहित्यिक कुरूंदकर आपल्या पुस्तकात लिहितात की, छत्रपती शिवाजी महाराज प्रत्येक पराजयात विजयाचे बीज रोवायचे, हे आपण समजून घेतले पाहिजे असे ते यावेळी म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक डॉ. जी. एस. पाटील केले. सूत्रसंचालन महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु. सुप्रिया वाघमारे तर आभार कु. प्राजंली सोनसळे यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# चंदेरी

## कपिल शर्माची संपत्ती किती?



कॉमेडियन कपिल शर्मा हा त्याच्या विनोदी शैलीसाठी खूप लोकप्रिय आहे. 'द कपिल शर्मा शो'ने त्याला वेगळी ओळख दिली. आज तो भारतातील सर्वाधिक मानधन घेणाऱ्या कलाकारांपैकी एक आहे. आता त्याची एकूण संपत्ती किती हे त्याने स्वतः सांगितलं आहे.

कपिल शर्मा वर्षाला १५ कोटी रुपये कर भरतो. इतकंच नाही तर तो त्याच्या शोच्या एका एपिसोडसाठी जवळपास ५० लाख रुपये घेतो. कपिलची एकूण संपत्ती ३०० कोटींच्या आसपास असल्याचं बोललं जात आहे. आता याबाबत त्याला एका मुलाखतीत विचारलं गेलं असता याचं त्याने हसत हसत उत्तर दिलं. त्याला विचारण्यात आलं की, त्याची एकूण संपत्ती ३०० कोटी रुपये आहे का? यावर उत्तर देताना तो हसला आणि म्हणाला, मी खूप पैसे गमावलेही आहेत. पण खरं सांगायचं तर मी या सगळ्याचा विचार करत नाही. माझ्याकडे घर आहे, कार आहे, माझं कुटुंब आहे आणि माझ्यासाठी तेच महत्वाचं आहे. अर्थात, मी संत नाही. मी चांगले पैसे नाकारणार नाही. पण मी पगाराचा विचार करणारा माणूस आहे. आता त्याचं हे उत्तर खूप चर्चेत आलं आहे.

## शाहरुखचा मन्नत 'इतक्या' कोटींचा!



**अभिनेता शाहरुख खान बॉलिवूडमधील सगळ्यात श्रीमंत अभिनेत्यांपैकी एक आहे. आज तो कोट्यवधी संपत्तीचा मालक आहे. वांद्रे येथे असलेल्या मन्नत या त्याच्या आलिशान बंगल्यामध्ये तो राहतो. शाहरुख खान प्रमाणेच या बंगल्याबद्दल जाणून घेण्यासाठी देखील त्याचे चाहते उत्सुक असतात. शाहरुखच्या संपत्तीमधील या त्याच्या बंगल्याचा वाटा खूप मोठा आहे.**

शाहरुख खान नेहमीच त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे, त्याच्या लाईफस्टाईलमुळे खूप चर्चेत असतो. त्याचे महागडे कपडे, किंमती गाड्या पाहून सगळेच अवाक् होतात. याचबरोबर त्याचा बंगला मन्नत हा देखील नेहमीच चर्चेचा विषय बनत असतो. शाहरुखचा हा मन्नत बंगला २७ हजार स्क्वेअर फुटचा आहे. २००१ पासून शाहरुख त्याच्या कुटुंबीयांबरोबर याच ठिकाणी वास्तव्यास आहे. हा बंगला शाहरुखने विकत घेण्यापूर्वी त्याचं नाव विएना असं होतं, तर त्याच्या मालकाचं नाव नरिमन दुबाश होतं. २००१ मध्ये शाहरुख खानने १३.३२ कोटींना हा बंगला विकत घेतला होता. शाहरुखने सुरुवातीला या बंगल्याचं नाव 'जन्नत' असं ठेवलं होतं. पण नंतर ते बदलून मनात असं केलं. शाहरुखने हा बंगला विकत घेतल्यानंतर त्याची पत्नी गौरी खान हिने एका आर्किटेक्टबरोबर मिळून त्याचा इंटिरियर डिझाईनिंग केलं. या बंगल्याला सहा मजले, अनेक खोल्या, एक अवॉर्ड रूम, एक छोटसं मूव्ही थिएटर, जिम आणि स्विमिंग पूलही आहे. रिपोर्टनुसार या आलिशान बंगल्याची किंमत आज २०० कोटी आहे. त्याचबरोबर या घराच्या बाहेर लावलेल्या डायमंड नेमप्लेटची किंमत २५ लाखांच्या घरात आहे. काही महिन्यांपूर्वीची डायमंड नेमप्लेट गौरी खानने बदलून घेतली होती. मन्नत बरोबरच शाहरुखचे दिल्ली आणि लंडन येथे देखील घर आहे.

## मनोज बाजपेयींकडे 170 कोटींची संपत्ती?

अभिनेते मनोज बाजपेयी हे विविध कारणांमुळे चर्चेत असतात. दर्जेदार अभिनयाने मनोज यांनी प्रेक्षकांच्या मनावर छाप पाडली आहे. एका छोट्याश्या गावातून येत मनोज बाजपेयींनी बॉलीवूडमध्ये आपलं वेगळं स्थान निर्माण केलं आहे. मनोज बाजपेयींच्या चित्रपटाबरोबरच त्यांच्या संपत्तीची अनेकदा चर्चा होते. बाजपेयींकडे एकूण १७० कोटी रुपयांची संपत्ती असल्याच्या चर्चा सुरू आहेत. आता या चर्चांनंतर बाजपेयी यांनी प्रतिक्रिया देत आपल्या संपत्तीबाबत खुलासा केला आहे. बाजपेयी म्हणाले, अजिबात नाही. पण हो, देवाच्या कृपेने माझे आणि माझ्या पत्नीचे म्हातारपण नीट जाईल याची खात्री आहे. आणि माझी मुलगीपण सेटल होईल, असं बाजपेयी म्हणाले.

## गायक अरिजित सिंहची संपत्ती किती?

मधूर आवाजाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या बॉलिवूड गायक अरिजित सिंहची अनेक गाणी सुपरहिट झाली आहेत. आवाजाने बॉलिवूडमध्ये स्वतःचं वेगळं स्थान निर्माण करणाऱ्या अरिजितचा चाहता वर्गही मोठा आहे. अरिजितच्या कॉन्सर्टलाही हजारो चाहते उपस्थित असतात. अरिजित सिंहला लाइव्ह ऐकण्यासाठी चाहते गर्दी करतात. तो कॉन्सर्टमध्ये एक गाणं गाण्यासाठी आठ ते दहा लाख रुपये घेतो, तर एका कॉन्सर्टसाठी अरिजित एक ते दीड कोटी रुपये आकारतो. अरिजित सिंह लक्झरियस आयुष्य जगतो. मुंबईत त्याचं आलिशान घर आहे. त्याची किंमत सुमारे आठ कोटी रुपये इतकी आहे. अरिजित गाड्यांचा शौकीन आहे. त्याच्याकडे अनेक महागड्या गाड्यांचं कलेक्शन आहे. अरिजितकडे मर्सिडीज बेंझ, रेंज रोव्हर या गाड्या आहेत. सुमधूर आवाजाने प्रेक्षकांचं मनोरंजन करणारा अरिजित सिंह कोट्यधीश आहे. मीडिया रिपोर्टनुसार, अरिजित सिंहकडे एकूण ७ मिलियन डॉलर्सची संपत्ती आहे. भारतीय रुपयानुसार, अरिजित सिंह ५५ कोटींचा मालक आहे.



## हॉटेलमध्येही झोपते जमिनीवर

**अभिनेत्री व नृत्यांगना म्हणून माधुरीने अत्यंत कमी काळात स्वतःला सिद्ध केले आहे. गरीब घरात जन्मलेल्या माधुरीने स्वतःच्या हिमतीवर यश मिळवले आहे.**

सोशल मीडियावर माधुरी सक्रिय असते. फोटो, व्हिडीओ शेअर करून ती चाहत्यांच्या संपर्कात असते. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत तिने धक्कादायक खुलासा केला. तिने सांगितलं, की मी चौथीत होते तेव्हा पहिलं लव्ह लेटर मला आलं होतं. त्यावेळी मला लव्ह लेटर वगैरे काही कळत नव्हतं. त्यामुळे मी ते घरी दिलं. घरच्यांना कळल्यावर शाळेत खूप राडे झाले होते. मला दुसरं लव्ह लेटर मी आठवीत असताना आलं होतं. तुषार नावाच्या मुलाने दिलेलं हे लेटर मी अजूनही जपून ठेवलं आहे. तेव्हा मला चश्मा होता अन् त्या मुलाने चश्मा असलेल्या मुलीच्या फोटोचं चित्र लव्ह लेटरवर काढलं होतं, असं माधुरीने सांगितलं. माधुरीने पहिल्या प्रपोजबद्दलही खुलासा केला. ओंकार नावाच्या मुलाला एकदा तिने प्रपोज केलं होतं, असं माधुरीने सांगितलं. तिच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास 'देव माणूस' आणि 'तुझ्यात जीव रंगला' या मालिकेतील भूमिकांसाठी माधुरी ओळखली जाते.

### मोठमोठ्या गाद्यांवर झोप लागत नाही...

मुलाखतीत तिने ती कायम जमिनीवर झोपते, असाही खुलासा केला. यामागचे कारणही तिने सांगितले. मी घरी असताना खाली जमिनीवर झोपते. माझ्याकडे धनगर समाज वापरतात ती जान आहे. ती मी अंथरते त्यावर चादर टाकते आणि खाली झोपते. मी बेडवर झोपत नाही. कारण मला बेडवर झोप येत नाही, असे माधुरी म्हणाली. मी जेव्हा बाहेर फाईव्ह स्टार किंवा सेव्हन स्टार हॉटेलमध्ये जाते तेव्हा माझी मोठी पंचायत होते. कारण तिथे बेडवर मोठमोठ्या गाद्या असतात. मला त्यावर कधीच झोप लागत नाही. त्यामुळे मग अनेकदा मी हॉटेलमध्ये गेल्यावर बेडशीट काढते. ती खाली अंथरते आणि दुसरं अजून एक बेडशीट मागवून ते अंगावर घेऊन झोपते, असे माधुरीने सांगितले.



### संघर्षमयी प्रवास...

माधुरीन तिच्या आयुष्याबद्दल, संघर्षाबद्दल भाष्य केलं. लहानपण झोपडपट्टीत पत्र्याच्या घरात गेलं, त्याच घरात राहून शिक्षण पूर्ण केलं, असं माधुरीने सांगितलं. माधुरीला कधी पालकांचा मार खावा लागलाय का? असा प्रश्न विचारण्यात आला, त्यावर माधुरीने एक घटना सांगितली. 'एकदा आई-बाबांचं भांडण सुरू होतं. आता वडील दारू पित नाही, पण त्यावेळी प्यायचे. त्यामुळे त्यांचं मानसिक संतुलन ठीक नव्हतं. दारूच्या नशेत त्यांनी आईला मारण्यासाठी हात उचलला आणि मी मध्ये आले. त्यामुळे मला लागलं. तेव्हा पहिल्यांदा दुर्दैवाने मी मार खाल्ला होता. त्यानंतर बाबांना खूप वाईट वाटलं होतं. त्यांनी स्वतःच्या हाताला इजा करून घेतली होती. त्यानंतर त्यांनी कधीच मारलं नाही. त्या एका घटनेशिवाय मला लहानपणापासून कधीच मार पडला नाही, असं माधुरीने सांगितलं. दरम्यान, माधुरी सध्या साताऱ्यातच राहते. तिला तिथेच राहायला खूप आवडतं. ती शूटिंगसाठी साताऱ्याहून मुंबईचा प्रवास करत असते.

## सलमानला करायचं होतं जुहीसोबत लग्न!



**तब्बल ६ अभिनेत्रींना डेट करूनही सगळ्यांचा लाडका भाईजान अजूनही सिंगलच आहे. मात्र, बॉलिवूडमध्ये एक अशी अभिनेत्री आहे जिच्याशी सलमानला लग्न करायचे होते. सलमान लग्नासाठी त्या अभिनेत्रीच्या वडिलांनाही भेटला होता. याबाबत सलमानने स्वतः खुलासा केला आहे.**

ती अभिनेत्री दुसरी तिसरी कोणी नसून जूही चावला आहे. सलमानला जूहीशी लग्न करण्याची इच्छा होती. सलमानला जूही खूप गोड वाटायची म्हणून त्याला तिच्याशी लग्न करायचे होते. एवढंच नाही तर सलमान लग्नासाठी जूहीच्या वडिलांनाही जाऊन भेटला होता. मात्र, जूहीच्या वडिलांनी सलमानला नकार दिला. जुहीच्या वडिलांनी त्याला का नाकारले होते? आपल्या मुलीसाठी त्यांना मुलामध्ये कोणते गुण हवे होते हे अद्याप सलमानला समजले नाही. जूही आणि सलमानने दिवाना मस्ताना या एकाच चित्रपटात एकत्र काम केलं आहे. या चित्रपटात सलमान आणि जूहीसह नील कपूर आणि गोविंदाही मुख्य भूमिकेत दिसले होते. या चित्रपटात सलमान खानची खास भूमिका होती. हा चित्रपट डेव्हिड धवनने दिग्दर्शित केला होता. जुहीने १९९५ मध्ये बिझनेसमन जय मेहताशी लग्न केले होते. त्यांना दोन मुले आहेत. आतापर्यंत सलमानचे सहा अभिनेंत्रीबरोबर नाव जोडलं गेल्याचं पहायला मिळालं आहे. ज्यामध्ये संगीता बिजलानी, ऐश्वर्या राय, कतरीना कैफ, झरीन खान, लुलिया वेंतूर यांचा समावेश आहे. मात्र, सलमानने यातील एकाही अभिनेत्रीबरोबर घर बसवले नाही.

### लग्नाचं वय आता सरलं...

सलमानला एका इवेंटदरम्यान एका महिलेने थेट लग्नासाठी मागणी घातली होती. ती म्हणाली, तू माझ्याशी लग्न करशील का? यावर सलमानने त्याच्या खास शैलीत उत्तर दिलं होतं. सलमान म्हणाला, माझ्यासाठी लग्न करायचे दिवस संपल्यात जमा आहेत. तू मला २० वर्षांपूर्वी भेटायला हवी होतीस. सलमानकडून हे उत्तर तसं अपेक्षितच होतं, पण तरी त्याने ही गोष्ट अगदी प्रांजळपणे कबूल केली.

## घराणेशाहीबद्दल तापसी पन्नू म्हणाली...



**तापसी पन्नूने २०१३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'चश्मे बद्दूर' या चित्रपटातून अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. यावर्षी तापसीच्या बॉलीवूडमधील करिअरला ११ वर्षे पूर्ण झाली आहेत. कोणतीही बॉलीवूड पार्श्वभूमी नसताना तिचा इथंवर पोहोचण्याचा प्रवास नक्कीच सोपा नव्हता. अलीकडेच तापसी पन्नूने बॉलीवूडमधील घराणेशाहीचा तिच्यावर कसा परिणाम झाला, याबाबत भाष्य केले आहे.**

तापसीने सांगितले की, बॉलीवूडमध्ये काही विशिष्ट ग्रुप असतात. याबाबत आता लोकांनाही माहिती आहे. मित्रमंडळीचा एक ग्रुप, विशिष्ट एजन्सीच्या हाताखाली काम करणाऱ्या कलाकारांचा एक ग्रुप असे अनेक ग्रुप आहेत, परंतु प्रत्येक कलाकाराला आपल्या आवडत्या भूमिकेची निवड करण्याचा अधिकार असला पाहिजे. इंडस्ट्रीत सर्वकाही चांगले असेल याचा मी कधीच विचार केला नव्हता. या प्रवासात माझ्याबरोबर अनेकदा भेदभाव करण्यात आला. अर्थात, कायम भेदभाव होणार याचीही कल्पना होती म्हणून याबाबत मी कधीच तक्रार केली नाही. या इंडस्ट्रीतील वातावरण बहुतेक वेळा तुमच्या विरोधात असते याची कल्पना असूनही तुम्हाला बॉलीवूडचा एक हिस्सा व्हायचे असेल तर ती तुमची स्वतःची निवड आहे. म्हणूनच तुम्ही कशाबद्दलच तक्रार करू शकत नाही, असे तापसी म्हणाली. बॉलीवूड इंडस्ट्रीत काम करायचे असेल तर तुम्हाला स्वतःला सिद्ध करावे लागते. प्रत्येक चित्रपटासाठी संघर्ष करावा लागतो. एका ब्लॉकबस्टर चित्रपटामुळे तुमचे संपूर्ण आयुष्य बदलत नाही. स्वतःचे स्थान निर्माण करण्यासाठी आपल्याला सतत चांगले काम करत राहावे लागते, असे ती म्हणाली.

### 2008 चा कटू अनुभव

तापसी वेगवेगळ्या कारणांमुळे सतत चर्चेत असते. आता तिने 'मिस इंडिया' स्पर्धेदरम्यान तिला आलेला अनुभव शेअर केला आहे. २००८ साली ती या स्पर्धेत सहभागी झाली होती. पण तिला यादरम्यान अनेक वाईट प्रसंगांना सामोरं जावं लागलं. तापसी म्हणाली, ही गोष्ट २००८ ची आहे. तेव्हा मी विद्यार्थी होते. मी चांगले मार्क मिळवत राहील या अटीवर मी माझ्या आई - वडिलांना मला या स्पर्धेत सहभागी होऊ देण्यासाठी राजी केलं. मला अजिबात अंदाज नव्हता की या स्पर्धेसाठी काय काय सुरू होतं. मला सत्य विचारू नका, खोटं मी बोलू शकत नाही आणि सत्य कदाचित मी सांगू शकणार नाही. पण मी काय करू शकते हे मी तुम्हाला नक्कीच दाखवू शकते. ती म्हणाली, माझी जेव्हा या स्पर्धेसाठी त्यासाठी निवड झाली तेव्हा माझा यावर अजिबात विश्वास बसत नव्हता. मला या गोष्टीची खात्री होती की मी टॉप १० मध्ये पोहोचल्यावर या स्पर्धेतून मला बाहेर काढले जाईल. या स्पर्धेसाठी संपूर्ण देशातून २८ आणि दिल्लीतून दोन-तीन मुली निवडल्या गेल्या होत्या, ज्यातील एक मी होते. माझ्याबरोबर बाकी सगळ्या प्रोफेशनल मॉडेल होत्या. त्यावेळी मी फक्त फोटोशूट केलं होतं. मी कुठलीही जाहिरात केली नव्हती किंवा कधीही रॅम्पवॉकही केला नव्हता. याचं कारण म्हणजे ते सगळे शो रात्री होतात आणि माझे बाबा मला रात्रीचे जाऊ द्यायचे नाहीत.याच दरम्यान तिला आलेले कटू अनुभवही तिने सांगितले. ती म्हणाली, मिस इंडिया ट्रायल्सच्या वेळी सर्वांसमोर मला टोचून बोलण्यात आलं होतं.

## सई ताम्हणकर म्हणते, लोक खूप निष्ठुर आणि निर्दयी झालेत!

**मराठी मनोरंजन सृष्टीतील आघाडीच्या अभिनेत्रींच्या यादीत सई ताम्हणकर हीचं नाव कायमच वरच्या स्थानी असतं. फक्त मराठीतच नाही तर हिंदी सिनेसृष्टीतही तिने तिची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. ती तिच्या कामांबरोबरच तिच्या वैयक्तिक आयुष्यामध्ये देखील चांगलीच चर्चेत असते. अनेकदा तिला ट्रोलिंगचाही सामना करावा लागतो. आता यावर तिने तिचं स्पष्ट मत मांडलं आहे.**

सई ताम्हणकरचा चाहतावर्ग खूप मोठा आहे. सोशल मीडियावर सर्वाधिक फॉलोवर्स असणाऱ्या मराठी अभिनेत्रींपैकी ती एक आहे. सई सोशल मीडियावर विविध पोस्ट शेअर करत तिच्या चाहत्यांच्या संपर्कात असते. तिचे ग्लॅमरस फोटो सर्वांचंच लक्ष वेधून घेत असतात. तर तिच्या लूकमुळे तिला कधी कधी ट्रोलही केलं जात. आता या होणाऱ्या ट्रोलिंगकडे ती कशी बघते हे तिने सांगितलं आहे. सईने नुकतीच मुलाखत दिली. या मुलाखतीत ट्रोलिंगबद्दल बोलताना ती म्हणाली, "हल्ली कशाहीवरून ट्रोलिंग होतं. आपलं दिसणं, आपण परिधान केलेले कपडे, आपण मांडलेलं मत यावरून टीका केली जाते. पण आता ट्रोलिंग हा आमच्या व्यवसायाचा भाग आहे असं म्हणून आम्ही ते स्वीकारलं आहे. आज लोक खूप निष्ठुर आणि निर्दयी झाले आहेत. पूर्वी लोक आब राखून, विनम्रतेने व्यक्त होत असत. ते आता दिसत नाही." पुढे ती म्हणाली, "समोरचा माणूस आक्षेपार्ह भाषेत बडबड करत असेल तर आपणही त्याला उत्तर द्यायचं का? अजिबात नाही..! त्याच्याकडे सरळ दुर्लक्ष करायचं आणि तसं मी करते. आपण आपली सद्सदविवेकबुद्धी शाबूत ठेवून ट्रोलिंगला सामोरं जायचं." आता तिचं हे बोलणं खूप चर्चेत आलं असून तिच्या या विचारांचं, तिच्या संयमाचं नेटकरी कौतुक करत आहेत.



# आरएसएस मानहानी प्रकरणात राहुल गांधी भिवंडी कोर्टात हजर; काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ नवे जामीनदार



**मुंबई(प्रतिनिधी)**–लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी शनिवार, दि. २१ फेब्रुवारी रोजी भिवंडी कोर्टात हजेरी लावली. २०१४ मधील आरएसएस मानहानी प्रकरणात ते अतिरिक्त सत्र न्यायालयात हजर झाले. यापूर्वी माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील यांनी राहुल गांधींच्या जामिनासाठी जामीनदार म्हणून काम पाहिले होते. मात्र त्यांच्या निधनानंतर आता राहुल गांधी यांचे जामीनदार काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ असतील. राहुल गांधी दिल्लीहून एअर इंडियाच्या विमानाने मुंबईत आले. मुंबईहून ते रस्त्याने भिवंडीला न्यायालयात पोहोचले. त्यांनी मुख्य न्याय दंडाधिकारी न्यायालयात हजर राहत नवा जामीनदार दिला.

**राहुल गांधी यांना काळे झेंडे दाखवले**

दरम्यान, राहुल गांधी यांना भाजप कार्यकर्त्यांकडून काळे झेंडे दाखवण्यात आले. त्यांना वेळीच पोलिसांनी हस्तक्षेप करत रोखले. राहुल गांधी यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर ठाणे पोलिसांनी न्यायालय परिसरात कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. खबरदारी म्हणून न्यायालयाच्या १०० मीटर परिसरातील दुकानेही बंद ठेवण्यात आली. सुनावणीनंतर राहुल गांधी पुन्हा रस्त्याने मुंबई विमानतळाकडे रवाना झाले. भिवंडी कोर्टातून बाहेर पडल्यानंतर राहुल गांधी यांचा ताफा भिवंडी शहरातून बाहेर पडत असताना भिवंडी शहरातील नागरिकांना हात दाखवत अभिवादन केले.

**काँग्रेस नेत्यांकडून राहुल यांचे स्वागत**

दरम्यान, काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या स्वागतासाठी मुंबई विमानतळावर उपस्थित होते. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, नसीम खान यांनी राहुल गांधी यांचे स्वागत केले.

दरम्यान, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार सुरेश मात्रे उर्फ बाळ मामा यांनी राहुल गांधी यांची भेट घेतली. १२ वर्षे होऊन गेले या घटनेला तरी देखील अजूनही केस सुरू आहे हे दुर्दैव असल्याचे सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी सांगितले.

# अनधिकृत बॅनर्स काढताना छत्रपती संभाजीनगरात मनपा कर्मचाऱ्याचा शॉक लागून अंत; एक जखमी

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** –छत्रपती संभाजीनगर शहरात अनधिकृत बॅनर्स काढण्याची कारवाई एका तरुण कर्मचाऱ्यासाठी जीवघेणी ठरली. मुकुंदवाडी परिसरात हनुमान मंदिरावरील होर्डिंग काढताना लोखंडी फ्रेम ३३ केव्ही वीज तारेच्या संपर्कात आल्याने महापालिकेचा कर्मचारी अमोल दिनकर जाधव (वय २७) यांचा विजेचा धक्का बसून दुर्दैवी मृत्यू झाला. या दुर्घटनेत रवी रणधीर रिडलॉन (वय ३८) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर सिग्मा हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. अचानक घडलेल्या या घटनेमुळे जाधव कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

छत्रपती संभाजीनगरच्या मुकुंदवाडी येथील हनुमान मंदिरावर लावलेले अनधिकृत होर्डिंग्ज काढण्याची कारवाई महापालिकेकडून सुरू होती. सकाळी सुमारे साडेनऊ वाजण्याच्या सुमारास कर्मचारी लोखंडी फ्रेम असलेले होर्डिंग खाली उतरवत होते. होर्डिंग काढल्यानंतर त्याची लोखंडी फ्रेम जवळून जाणाऱ्या ३३ केव्ही वीज तारेच्या संपर्कात आली. यामुळे अमोल जाधव यांना तीव्र विजेचा धक्का बसला. त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेत रवी रिडलॉन हेही जखमी झाले आहेत.

अचानक घडलेल्या या दुर्घटनेमुळे जाधव यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून त्यांनी तीव्र आक्रोश व्यक्त केला आहे. सुरक्षिततेच्या उपाययोजनांबाबत प्रश्न उपस्थित होत असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच संबंधित विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास सुरू आहे.

## Change In Name

My old name is SHIVNANDA D/o DHARMAJI NIWDANGE which now I am changeing as new name MAYAWATI W/o PRAKASHRAO SAWANT Hence forth my all correspondence will be done as per my name please consider the same adress. ADRESS.Prakash Kishanrao Sawant Plot No.99 Kalyan Nagar Taroda (BK) Near Raj corner Nanded- 431605

Mo.No.9766487373

## टी. सी. हरवली

माझी राखी राजपालसिंह बायस या नावाची इयत्ता दहावी पासची टी. सी. हडको ते नांदेड दरम्यान दुचाकी प्रवासात हरवली आहे. ज्यांना कोणाला सापडली असेल त्यांनी कृपया खालील मोबाईल नंबरवर संपर्क साधावा.

मोबाईल नंबर ९०११०७६५४३

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व संबधीतांना या जाहीर प्रगटनाव्दारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार शेख गौस पि. शेख चांद, रा. फत्तेबुरुज नालारोड, गाडीपुरा नांदेड ता.जि. नांदेड यांनी दिलेल्या माहीती व अधिकारा वरुन व निजामकालीन कागदपत्रा वरुन मी हे जाहीर प्रगटन खालील प्रमाणे देत आहे.

हे की, माझे वरील पक्षकाराची पंजी नामे जेमालबी भ्र. शेख चांद हे मौजे कनका ता. कळमनुरी जि. परभणी ( पुर्वीचा तालुका व जिल्हा ) सध्याचा जिल्हा हिंगोली येथील रहिवाशी होते त्यांना महसुली नोंदी प्रमाणे व रेकॉर्ड प्रमाणे तसेच पाहाणी पत्रक व खासरा पत्रक व इतर निजाम कालीन कागदपत्रा नुसार २९ एकर १५ गुंठे जमीन सर्व्हे क्र. ५४ मध्ये इनाम पध्दतीने देण्यात आली होती.

हे की, वरील जेमालबी भ्र. शेख चांद यांनी सदरची जमीन वहीती करुन आपला उदर निर्वाहा केला त्या उभयतांना शेख वजिक्र हा एकमेवा वारस होता. कनका गावातील जातीय त्रासा मुळे जेमालबी व त्यांचे कुटुंबियानी सदरचे गाव सोडुन इतरत्र राहाण्यासाठी गेले. सदरची जमीन ही त्यांचे कुटूंबिय वहिती करत असतांना बेकायदेशिरपणे या जमीनीचे अनेक गटा मध्ये विभागणी करुन ते इतराच्या नांवाने नोंद करण्यात आले. त्यात गट क्र. २३४ मध्ये रामहारी सदाशिव काटकर, शिवचरण बापुराव काटकर, गट क्र. २३५ मध्ये भिकाजी महादजी काटकर, गट क्र. २३८ मध्ये कम लबाई आप्पाराव मस्के, गट क्र. २४१ मध्ये शंकर सोनाजी काटकर, गट क्र.४३ मध्ये रामराव गंगाराम बुध्दवंत, गट क्र.२४० मध्ये दिलीप श्यामराव बुधवंत, दिनकर नारायणराव नाईक, तसेच चद्रकांत महादजी काटकर इत्यादी लोकांच्या नांवाने सदरची जमीन ही खरेदीखता व्दारे चुकीचे फेरफार लावुन त्यांना मालकी रकाण्यात त्यांची नांवे घेण्यात आलेली आहेत. जेमालबी भ्र. शेखचांद यांचा पंतु शेख गौस शेख चांद यांनी मा. उभागीय अधिकारी हिगोंली यांचे कार्यालयात वरील फेरफार रध्द होण्यासाठी कार्यवाही दाखल करीत आहेत.

तरी वरील सर्व गट क्र. व मालका बाबत कोणीही खरेदी विक्री, गहाण, हस्तांतर, लिज, इत्यादी प्रकारचे कोणतेही व्यवहार या जमीनी बाबत करुनये कारण हे सर्व गट क्रंमाक/ सर्व्हे क्र. ५४ चा भाग आहे जे की, जेमालबी भ्र. शेख चांद यांच्या मालकीचे आहे. सर्व संबधीतास या जाहीर प्रगटणा व्दारे सुचित करण्यात येते की, वरील जमीनी बाबत वरील व्यक्तीशी कोणीही कसल्याही प्रकारचा व्यवहार करुनये केल्यास तो व्यवहार माझे पक्षकार यांना बंधन कारक राहाणार नाही. करीता हे जाहीर प्रगटन.

मार्फत
अॅड एम. एन. शिंगे,
नांदेड
मो.क्र. ८००७०४०३५८

जाहीर प्रगटन देणार
शेख गौस पि. शेख चांद,
रा. फत्तेबुरुज, नालारोड गाडीपुरा नांदेड

### नगरपरिषद, उमरी जि. नांदेड. जाहीर प्रगटन (नांव परिवर्तन करणे बाबत)

श्री कृष्णकांत गंगाधर सोळंके रा. उमरी सर्व्हे नं. १६४ प्लॉट नं. १०८ चा भाग, वार्ड नं. ०९, झोन क्र. --, जुना मा. क्र. १८ न.पा.मा.क्र. ३३८, नवीन मालमत्ता क्र. -- या जाहीर प्रगटनाद्वारे उमरी नगरवासियांना जाहीररित्या कळविण्यात येते की, श्रीमती चित्रकलाबाई गंगाधरराव सोळंके (कायम ठेवून) रा. उमरी यांच्या नावे असलेली मालकी हक्काची सर्व्हे नं. १६४ प्लॉट नं. १०८ चा भाग, वार्ड नं. ०९, झोन क्र. --, जुना मा. क्र. १८ न.पा.मा.क्र. ३३८ ज्याची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे. पूर्वेस- उपलवार यांचे घर, पश्चिमेस - बी. के. जाधव सरांचा प्लॉट, दक्षिणेस -प्लॉट क्र. १०७, उत्तरेस -१२ मीटर रस्ता.

संमती वाटणीपत्र २३/२६ दि.३०/०१/२०२६ आधारे खरेदी केली आहे. वाटणीनुसार हिश्यास आली आहे. वारसा हक्काने मालकी हक्क प्राप्त झाला आहे. म्हणून नगरपालिकेच्या मालमत्ता रिव्हिजन रजिस्टरमध्ये श्री कृष्णकांत गंगाधर सोळंके यांच्या नावे नोंद घेण्यात येत आहे. ज्या कोणा नातेवाईक व हितसंबंधितांना वरीलप्रमाणे नाव परिवर्तन होत असल्याबाबत आक्षेप असेल तर त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप सबळ पुराव्यासह या कार्यालयात सादर करावा. नसता मुदत संपल्यानंतर अर्जदाराचे नाव मालमत्ता रिव्हीजन रजिस्टरमध्ये नोंदविण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, उमरी ता. उमरी जि. नांदेड**

## जाहीर प्रगटन

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बिलोली यांचे न्यायालय
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १७३ / २०२४
शेषेराव व ईतर विरुध्द शाखाधिकारी

अर्जदार :- १. शेषेराव पि. गणपतराव मुरके, वय ५२ वर्षे, २. विठ्ठल पि. गणपतराव मुरके, वय ५० वर्षे, ३. बापुराव पि. गणपतराव गुरके, वय ४० वर्षे, ४. नारायण पि. गणपतराव मुरके, वय ४७ वर्षे, सर्व रा. हिंगणी ता. बिलोली जि. नांदेड

गैरअर्जदार
विरुध्द
मा. शाखाधिकारी, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,
शाखा- बिलोली ता. बिलोली जि. नांदेड
विषय :- उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मत गणपतराव पि. बाजीराव मुरके यांचे अर्जदार क्र. १ ते ४ हे मुले आहेत. अर्जदार हे मौ. हिंगणी येथील रहिवाशी आहेत. मयत गणपतराव पि. बाजीराव मुरके यांचा मृत्यु दिनांक ३०/०९/२०१७ रोजी येथे झाला आहे. अर्जदाराची आई नामे अनुसयाबाई गणपतराव मुरके यांचा मृत्यु दिनांक २१/०५/२०२३ रोजी झाला आहे. मयत गणपतराव पि. बाजीराव मुरके यांच्या नावे गैरअर्जदार यांच्या शाखेत बचत खाते उघडले होते व त्यांचा खाते क्र. ११४११११११०२२७६ (नवीन) असून त्यामध्ये रक्कम रु.३१,४२३.७७/- जमा आहेत. सदर रक्कम उचलण्यासाठी अर्जदार बँकेत गेले असता त्यांनी अर्जदारास वारसा प्रमाणपत्राची मागणी केली त्यामुळे अर्जदारास सदर वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मयताच्या पश्चात अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

हे की, मयत गणपतराव पि. बाजीराव मुरके यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारानी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत दिनांक १०/०३/२०२६ रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप /उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दि. १६ फेब्रुवारी, २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले आहे.

सहा अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, बिलोली

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकाराने दिलेल्या माहिती व अधिकारावरून सर्व जनतेस व संबंधितांना या जाहीर प्रगटनाद्वारे सुचीत करण्यात येते की, माझे पक्षकाराने १ श्री. शिवराय पि. केशवराव पुय, रा. कामठा (खु.) ता. जि. नांदेड, व २. श्री. कमील पि. गहेनाजी सोनाळे, रा. सांगवी (बु.) ता. जि. नांदेड यांच्याकडून त्यांनी सौदाचिट्ठी बॉन्ड नं. ६०इ २५३३४४ अधारे कायमचे खरेदी करण्याचा करार केलेला मौजे सांगवी येथील शेत गट नं. ८८ पैकी प्लॉट न. ६० चा पश्चिमेकडील भाग ज्याची लांबी दक्षिण-उत्तर ५० फुट व रुंदी पूर्व-पश्चिम १५ फुट आहे, ज्याचे एकुण क्षेत्रफळ ७५० चौ. फुट आहे व ज्याच्या चतुः सिमा

पूर्वेस : प्लॉट क्र. ६० चा उर्वरीत भाग
दक्षिणेस-प्लॉट क्र. ६१
पश्चिमेस-अंबा नगर
उत्तरेस-२० फुट रुद रोड

येणेप्रमाणे चतुः सिमेच्या आतील प्लॉट क्र. ६० चा पश्चिमेकडील भाग हा माझे पक्षकाराने वरनमुद १. श्री. शिवराय पि. केशवराव पुयड, रा. कामठा (खु.) ता. जि. नांदेड व २. श्री. कपील पि. गहेनाजी सोनाळे, रा. सांगवी (बु.) ता. जि. नांदेड यांच्याकडून कायमचे खरेदी करण्याचा करार केला आहे व सौदाचिठ्ठीवर ठरलेल्या कीमतीपैकी काही रक्कम बयाणा म्हणुन दिली आहे. लवकरच माझे पक्षकार विक्रेत्यास उर्वरित विक्री किंमत देवुन त्यांच्या संमतीने सदरील प्लॉट नंबर ६० चा पश्चिमेकडील भागाचे प्लॉटच्या मूळ मालकाकडून रजिस्टर्ड विक्रीखत करून घेणार आहेत. तरी सदरील खरेदी विक्रीच्या व्यवहाराबाबत कोणास कसल्याही प्रकारचा आक्षेप अथवा ऊजर असल्यास किंवा कोणत्याही बँकेचा अथवा खाजगी वित्तीय संस्थेचा बोजा, गहाणखत किंवा इतर कोणतेही हितसंबंध असल्यास संबंधितांनी हे जाहीर प्रगटन प्रसीध्द झाल्यापासुन ८ (आठ) दिवसाचे आत आपला लेखी आक्षेप अथवा उजर दाखल करावा. वरील मुदतीत कोणताही आक्षेप / ऊजर न आल्यास माझे पक्षकार रजिस्टर्ड विक्रीखत करून घेतील. मुदतीनंतर आलेले आक्षेप माझे पक्षकारावर बंधनकारक राहनार नाहीत. सबब सर्व जनतेच्या व संबंधिताच्या माहितीस्तव हे जाहीर प्रगटन प्रसिध्द केले आहे.

मार्फत
अॅड. आर. एन. आवटे
शेवंता निवास उमा महेश कॉलनी.
वाडी बु. नांदेड
मो. क्र. ९३७३२९७२२७

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकाराने दिलेल्या माहिती व अधिकारावरून सर्व जनतेस व संबंधितांना या जाहीर प्रगटनाद्वारे सुचीत करण्यात येते की, माझे पक्षकाराने १ श्री. शिवराय पि. केशवराव पुय, रा. कामठा (खु.) ता. जि. नांदेड, व २. श्री. कमील पि. गहेनाजी सोनाळे, रा. सांगवी (बु.) ता. जि. नांदेड यांच्याकडून त्यांनी सौदाचिट्ठी बॉन्ड नं. ६०इ २५३३४४ अधारे कायमचे खरेदी करण्याचा करार केलेला मौजे सांगवी येथील शेत गट नं. ८८ पैकी प्लॉट न. ६० चा पश्चिमेकडील भाग ज्याची लांबी दक्षिण-उत्तर ५० फुट व रुंदी पूर्व-पश्चिम १५ फुट आहे, ज्याचे एकुण क्षेत्रफळ ७५० चौ. फुट आहे व ज्याच्या चतुः सिमा

पूर्वेस : प्लॉट क्र. ६० चा उर्वरीत भाग
दक्षिणेस-प्लॉट क्र. ६१
पश्चिमेस-अंबा नगर
उत्तरेस-२० फुट रुद रोड

येणेप्रमाणे चतुः सिमेच्या आतील प्लॉट क्र. ६० चा पश्चिमेकडील भाग हा माझे पक्षकाराने वरनमुद १. श्री. शिवराय पि. केशवराव पुयड, रा. कामठा (खु.) ता. जि. नांदेड व २. श्री. कपील पि. गहेनाजी सोनाळे, रा. सांगवी (बु.) ता. जि. नांदेड यांच्याकडून कायमचे खरेदी करण्याचा करार केला आहे व सौदाचिठ्ठीवर ठरलेल्या कीमतीपैकी काही रक्कम बयाणा म्हणुन दिली आहे. लवकरच माझे पक्षकार विक्रेत्यास उर्वरित विक्री किंमत देवुन त्यांच्या संमतीने सदरील प्लॉट नंबर ६० चा पश्चिमेकडील भागाचे प्लॉटच्या मूळ मालकाकडून रजिस्टर्ड विक्रीखत करून घेणार आहेत. तरी सदरील खरेदी विक्रीच्या व्यवहाराबाबत कोणास कसल्याही प्रकारचा आक्षेप अथवा ऊजर असल्यास किंवा कोणत्याही बँकेचा अथवा खाजगी वित्तीय संस्थेचा बोजा, गहाणखत किंवा इतर कोणतेही हितसंबंध असल्यास संबंधितांनी हे जाहीर प्रगटन प्रसीध्द झाल्यापासुन ८ (आठ) दिवसाचे आत आपला लेखी आक्षेप अथवा उजर दाखल करावा. वरील मुदतीत कोणताही आक्षेप / ऊजर न आल्यास माझे पक्षकार रजिस्टर्ड विक्रीखत करून घेतील. मुदतीनंतर आलेले आक्षेप माझे पक्षकारावर बंधनकारक राहनार नाहीत. सबब सर्व जनतेच्या व संबंधिताच्या माहितीस्तव हे जाहीर प्रगटन प्रसिध्द केले आहे.

मार्फत
अॅड. आर. एन. आवटे
शेवंता निवास उमा महेश कॉलनी.
वाडी बु. नांदेड
मो. क्र. ९३७३२९७२२७

### नगरपरिषद, उमरी जि. नांदेड. जाहीर प्रगटन (नांव परिवर्तन करणे बाबत)

श्री सादक पाशामियाँ सय्यद रा. उमरी सर्व्हे नं. १६६ ए/१ प्लॉट नं. ५९, वार्ड नं. ०९, जुना मा. क्र. १७६१ नवीन न.पा.मा.क्र. १४६०, नवीन मालमत्ता क्र. -- या जाहीर प्रगटनाद्वारे उमरी नगरवासियांना जाहीररित्या कळविण्यात येते की, शेख अरबाज शेख बाबू रा. उमरी यांच्या नावे असलेली मालकी हक्काची सर्व्हे नं. १६६ ए/१ प्लॉट नं. ५९, वार्ड नं. ०९, जुना मा. क्र. १७६१ नवीन न.पा.मा.क्र. १४६० ज्याची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे. पूर्वेस- प्लॉट क्र. ८१, पश्चिमेस -प्लॉट क्र. ६०, दक्षिणेस-सर्व्हे नं. १६६ ची जमीन, उत्तरेस -३.०४ मीटर रोड.

खरेदीखत, बयनामा, रजिस्ट्री क्र. १२१/२०२६ दि.२७/०१/२०२६ आधारे खरेदी केली आहे. वाटणीनुसार हिश्यास आली आहे. वारसा हक्काने मालकी हक्क प्राप्त झाला आहे. म्हणून नगरपालिकेच्या मालमत्ता रिव्हिजन रजिस्टरमध्ये सादक पाशामियाँ सय्यद यांच्या नावे नोंद घेण्यात येत आहे. ज्या कोणा नातेवाईक व हितसंबंधितांना वरीलप्रमाणे नाव परिवर्तन होत असल्याबाबत आक्षेप असेल तर त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप सबळ पुराव्यासह या कार्यालयात सादर करावा. नसता मुदत संपल्यानंतर अर्जदाराचे नाव मालमत्ता रिव्हीजन रजिस्टरमध्ये नोंदविण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, उमरी ता. उमरी जि. नांदेड**

### नगरपरिषद, उमरी जि. नांदेड. जाहीर प्रगटन (नांव परिवर्तन करणे बाबत)

श्री शेख सलमा सादुल रा. उमरी सर्व्हे नं. १६६/ए/१, १६६/ए/२, प्लॉट नं. २३३, वार्ड नं. ०९, झोन क्र. --, जुना मा. क्र. -- न.पा.मा.क्र. १७४६, नवीन मालमत्ता क्र. -- या जाहीर प्रगटनाद्वारे उमरी नगरवासियांना जाहीररित्या कळविण्यात येते की, १. गफार महंमद साहब, २. सत्तार महंमद साहब रा. उमरी यांच्या नावे असलेली मालकी हक्काची सर्व्हे नं. १६६/ए/१, १६६/ए/२, प्लॉट नं. २३३, वार्ड नं. ०९, झोन क्र. --, जुना मा. क्र. -- न.पा.मा.क्र. १७४६ ज्याची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे. पूर्वेस- सर्व्हे नं. १६६/ए/१ ची जमीन पश्चिमेस - १५ फुटाचा रस्ता, दक्षिणेस -प्लॉट क्र. २३२, उत्तरेस -प्लॉट क्र. २३४.

खरेदीखत, बयनामा, रजिस्ट्री/ वाटणीपक क्र. ६५८/२०२४ दि.२२/०४/२०२४ आधारे खरेदी केली आहे. वाटणीनुसार हिश्यास आली आहे. वारसा हक्काने मालकी हक्क प्राप्त झाला आहे. म्हणून नगरपालिकेच्या मालमत्ता रिव्हिजन रजिस्टरमध्ये शेख सलमा सादुल यांच्या नावे नोंद घेण्यात येत आहे. ज्या कोणा नातेवाईक व हितसंबंधितांना वरीलप्रमाणे नाव परिवर्तन होत असल्याबाबत आक्षेप असेल तर त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप सबळ पुराव्यासह या कार्यालयात सादर करावा. नसता मुदत संपल्यानंतर अर्जदाराचे नाव मालमत्ता रिव्हीजन रजिस्टरमध्ये नोंदविण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, उमरी ता. उमरी जि. नांदेड**

### नगरपरिषद, उमरी जि. नांदेड जाहीर प्रगटन (नांव परिवर्तन करणे बाबत)

श्री अश्विन प्रकाश वाघमारे रा. सिंदी ता. उमरी सर्व्हे नं. १६६/ए/२, पैकी प्लॉट नं. १४, वार्ड नं. ०९, झोन क्र. ००, न.पा.मा.क्र. १५४९ या जाहीर प्रगटनाद्वारे उमरी नगरवासियांना जाहीररित्या कळविण्यात येते की, १. श्री शेख कौसर वझीर, २. सय्यद असर सय्यद आदिल रा. उमरी ता. उमरी यांच्या नावे असलेली मालकी हक्काची उमरी सर्व्हे नं. १६६/ए/२, पैकी प्लॉट नं. १४१, वार्ड नं. ०९, न.पा.मा.क्र. १५४९ ज्याची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे. पूर्वेस-सय्यद असर सय्यद आदिल यांची जागा, पश्चिमेस-२० फुटाचा रस्ता, दक्षिणेस -२० फुट रस्ता, उत्तरेस -प्लॉट नं. १४२.

खरेदीखत/बयनामा/ रजिस्ट्री पत्रक/ क्रमांक १८६८ दि. ३०/१२/२०२४ आधारे खरेदी केली आहे. वाटणीनुसार हिश्यास आली आहे. म्हणून नगरपालिकेच्या मालमत्ता रव्हिजन रजिस्टरमध्ये अश्विन प्रकाश वाघमारे यांच्या नावे नोंद घेण्यात येत आहे. ज्या कोणा नातेवाईक व हितसंबंधितांना वरील प्रमाणे नाव परिवर्तन होत असल्याबाबत आक्षेप असेल तर त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप सबळ पुराव्यासह या कार्यालयात सादर करावा. नसता मुदत संपल्यानंतर अर्जदाराचे नाव मालमत्ता रिव्हीजन रजिस्टरमध्ये नोंदविण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, उमरी ता. उमरी जि. नांदेड**

### नगरपरिषद, उमरी जि. नांदेड जाहीर प्रगटन (नांव परिवर्तन करणे बाबत)

श्रीमती मधुवती हरिबा वाघमारे रा. उमरी ता. उमरी सर्व्हे नं. १६६/ए/१, १६६/ए/२ पैकी प्लॉट नं. ८८, वार्ड नं. ०९, झोन क्र. ००, न.पा.मा.क्र. १८९३ या जाहीर प्रगटनाद्वारे उमरी नगरवासियांना जाहीररित्या कळविण्यात येते की, १. श्री गफार महम्मद साहब, २. सत्तार महमदसाब रा. उमरी ता. उमरी यांच्या नावे असलेली मालकी हक्काची उमरी सर्व्हे नं. १६६/ए/१, १६६/ए/२, पैकी प्लॉट नं. ८८, वार्ड नं. ०९, न.पा.मा.क्र. १८९३ ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. पूर्वेस-अंतर्गत रस्ता, पश्चिमेस -सर्व्हे नं.१६६/ए/१ चा भाग. दक्षिणेस -प्लॉट नं. ८७, उत्तरेस -प्लॉट नं. ८९.

खरेदीखत/बयनामा/रजिस्ट्री पत्रक/ क्रमांक ९७५/२०२५ दि. ०७/०७/२०२५ आधारे खरेदी केली आहे. वाटणीनुसार हिश्यास आली आहे. म्हणून नगरपालिकेच्या मालमत्ता रव्हिजन रजिस्टरमध्ये मधुमती हरिबा वाघमारे यांच्या नावे नोंद घेण्यात येत आहे. ज्या कोणा नातेवाईक व हितसंबंधितांना वरील प्रमाणे नाव परिवर्तन होत असल्याबाबत आक्षेप असेल तर त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप सबळ पुराव्यासह या कार्यालयात सादर करावा. नसता मुदत संपल्यानंतर अर्जदाराचे नाव मालमत्ता रिव्हीजन रजिस्टरमध्ये नोंदविण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, उमरी ता. उमरी जि. नांदेड**

### नगरपरिषद, उमरी जि. नांदेड जाहीर प्रगटन (नांव परिवर्तन करणे बाबत)

श्रीमती मधुवती हरिबा वाघमारे रा. कार्ला ता. उमरी सर्व्हे नं. १६८/ब पैकी प्लॉट नं. ५९, वार्ड नं. ०९, झोन क्र. ००, न.पा.मा.क्र. ५४४ या जाहीर प्रगटनाद्वारे उमरी नगरवासियांना जाहीररित्या कळविण्यात येते की, श्री सय्यद पाशा सय्यद रा. उमरी ता. उमरी यांच्या नावे असलेली मालकी हक्काची उमरी सर्व्हे नं. १६८/ब पैकी प्लॉट नं. ५९ चा भाग, वार्ड नं. ०९, न.पा.मा.क्र. ५४४ ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पूर्वेस-अंतर्गत रस्ता, पश्चिमेस -प्लॉट क्र. ६०. दक्षिणेस -अंतर्गत रस्ता, उत्तरेस -प्लॉट नं. ६६.

खरेदीखत/बयनामा/रजिस्ट्री पत्रक/ क्रमांक १०१९/२५ दि. ११/०७/२०२५ आधारे खरेदी केली आहे. वाटणीनुसार हिश्यास आली आहे. म्हणून नगरपालिकेच्या मालमत्ता रव्हिजन रजिस्टरमध्ये मधुमती हरिबा वाघमारे यांच्या नावे नोंद घेण्यात येत आहे. ज्या कोणा नातेवाईक व हितसंबंधितांना वरील प्रमाणे नाव परिवर्तन होत असल्याबाबत आक्षेप असेल तर त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप सबळ पुराव्यासह या कार्यालयात सादर करावा. नसता मुदत संपल्यानंतर अर्जदाराचे नाव मालमत्ता रिव्हीजन रजिस्टरमध्ये नोंदविण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, उमरी ता. उमरी जि. नांदेड**

### नगरपरिषद, उमरी जि. नांदेड जाहीर प्रगटन (नांव परिवर्तन करणे बाबत)

श्री शेख वहीद शेख आजम रा. कार्ला ता. उमरी सर्व्हे नं. १६५/ए पैकी प्लॉट नं.६६ चा भाग, वार्ड नं. ०९, झोन क्र. ००, न.पा.मा.क्र. ४८४/१ नवीन मालमत्ता क्र. ५०७ या जाहीर प्रगटनाद्वारे उमरी नगरवासियांना जाहीररित्या कळविण्यात येते की, श्री रघुदास सोमला जाधव रा. हुंडा तांडा ता. उमरी यांच्या नावे असलेली मालकी हक्काची उमरी सर्व्हे नं. १६५/ए पैकी प्लॉट नं. ६६ चा भाग, वार्ड नं. ०९, जुना न.पा.मा.क्र. ४८४/१, नवीन मालमत्ता क्र. ५०७ ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. पूर्वेस-संभाजी नागोराव देशमुख यांचा शिल्लक प्लॉट, पश्चिमेस -प्लॉट क्र. ६५ डोंगरे गोविंद लिंगराज यांचा आहे. दक्षिणेस -प्लॉट क्र. ६१, उत्तरेस -२० फुट रस्ता.

खरेदीखत/बयनामा/रजिस्ट्री पत्रक/ क्रमांक २०७/२६ दि. १२/०२/२०२६ आधारे खरेदी केली आहे. वाटणीनुसार हिश्यास आली आहे. म्हणून नगरपालिकेच्या मालमत्ता रव्हिजन रजिस्टरमध्ये शेख वहीद शेख आजम यांच्या नावे नोंद घेण्यात येत आहे. ज्या कोणा नातेवाईक व हितसंबंधितांना वरील प्रमाणे नाव परिवर्तन होत असल्याबाबत आक्षेप असेल तर त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप सबळ पुराव्यासह या कार्यालयात सादर करावा. नसता मुदत संपल्यानंतर अर्जदाराचे नाव मालमत्ता रिव्हीजन रजिस्टरमध्ये नोंदविण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, उमरी ता. उमरी जि. नांदेड**

### नगरपरिषद, उमरी जि. नांदेड जाहीर प्रगटन (नांव परिवर्तन करणे बाबत)

श्रीमती विजयालक्ष्मी हणमंत विजापुरे रा. उमरी सर्व्हे नं. १७९/१ पैकी प्लॉट नं.१४, वार्ड नं. ०९, झोन क्र. ०१, न.पा.मा.क्र. १०३, नवीन मालमत्ता क्र. १५३ या जाहीर प्रगटनाद्वारे उमरी नगरवासियांना जाहीररित्या कळविण्यात येते की, श्री शेख पाशामियाँ शेख सादरमियाँ रा. उमरी यांच्या नावे असलेली मालकी हक्काची उमरी सर्व्हे नं. १७९/१ प्लॉट नं. १४, वार्ड नं. ०९, झोन क्र. ०१, न.पा.मा.क्र. १०३, नवीन मालमत्ता क्र. १५३ ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पूर्वेस-अंतर्गत ९ मीटर रस्ता आहे, पश्चिमेस -केरसी यांचे प्लॉट पैकी भास्कर शेटे यांचा प्लॉट आहे. दक्षिणेस -अंतर्गत ९ मीटर रस्ता आहे, उत्तरेस -प्लॉट नं. १३.

खरेदीखत/बयनामा/रजिस्ट्री पत्रक/ क्रमांक २०५ दि. १२/०२/२०२६ आधारे खरेदी केली आहे. वाटणीनुसार हिश्यास आली आहे. म्हणून नगरपालिकेच्या मालमत्ता रव्हिजन रजिस्टरमध्ये विजयालक्ष्मी हणमंत विजापुरे यांच्या नावे नोंद घेण्यात येत आहे. ज्या कोणा नातेवाईक व हितसंबंधितांना वरील प्रमाणे नाव परिवर्तन होत असल्याबाबत आक्षेप असेल तर त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप सबळ पुराव्यासह या कार्यालयात सादर करावा. नसता मुदत संपल्यानंतर अर्जदाराचे नाव मालमत्ता रिव्हीजन रजिस्टरमध्ये नोंदविण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, उमरी ता. उमरी जि. नांदेड**

### नगरपरिषद, उमरी जि. नांदेड. जाहीर प्रगटन (नांव परिवर्तन करणे बाबत)

श्री गिरीष देविदास पोलावार रा. उमरी सर्व्हे नं. १३८ प्लॉट नं. १४, वार्ड नं. १५, झोन क्र. --, न.पा.मा.क्र. ६३३, नवीन मालमत्ता क्र. -- या जाहीर प्रगटनाद्वारे उमरी नगरवासियांना जाहीररित्या कळविण्यात येते की, श्रीमती शकुंतलाबाई नरसिंगराव देशमुख (झोन नं. १ नवीन मालमत्ता क्र. २१५४) रा. उमरी यांच्या नावे असलेली मालकी हक्काची उमरी सर्व्हे नं. १३८ प्लॉट नं. १४, वार्ड नं. १५, झोन क्र. ०१, नपामाक्र. ६३३ ज्याची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

पूर्वेस- प्लॉट नं. १५, पश्चिमेस - ३०.० वाईड म्हाडा रोड, दक्षिणेस -म्हाडा बिल्डींग, उत्तरेस -प्लॉट नं. १३.

खरेदीखत/बयनामा/रजिस्ट्री क्र. २०० दि.११/०२/२०२६ आधारे खरेदी केली आहे. वाटणीनुसार हिश्यास आली आहे. वारसा हक्काने मालकी हक्क प्राप्त झाला आहे. म्हणून नगरपालिकेच्या मालमत्ता रिव्हिजन रजिस्टरमध्ये श्री गिरीष देविदास पोलावार यांच्या नावे नोंद घेण्यात येत आहे. ज्या कोणा नातेवाईक व हितसंबंधितांना वरीलप्रमाणे नाव परिवर्तन होत असल्याबाबत आक्षेप असेल तर त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप सबळ पुराव्यासह या कार्यालयात सादर करावा. नसता मुदत संपल्यानंतर अर्जदाराचे नाव मालमत्ता रिव्हीजन रजिस्टरमध्ये नोंदविण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, उमरी ता. उमरी जि. नांदेड**


## प्लॉट विकणे आहे

डी मार्ट समोरील शिवरोड लगत गट क्रमांक १३३ मधील सूर्यनगरातील दोन प्लॉट विकणे आहे. प्लॉट क्रमांक ५ व ६. साईज ३० बाय ६०. १८०० चौरस फुट. पूर्वमुखी प्लॉट योग्य किंमत आल्यास विकणे आहे.

**संपर्क- मो. ९३७०७४८६०२**

## पाहिजे

कुशल आय.टी.आय. इलेक्ट्रीशियन/मोटार वाईडींग अनुभव व तसेच आय.टी.आय. टर्नर ट्रेड अनुभव किमान ५ वर्षे असावा. कमीत कमी वेतन १५,०००/- रू.
इच्छुकांनी खालील पत्यावर संपर्क करावा.

**-: संपर्क पत्ता :-**
**उषा इलेक्ट्रीकल वर्क्स,**
**सिडको एम.आय.डी.सी. नांदेड**
**मो.नं. ९९६०१२८१९१**



**रामबाण ईलाज**
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
**सेवा क्लिनीक**
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...
किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



## धर्माबाद पोलिसांच्या कारवाईत अवैध वाळू वाहतूक करणारे दोन हायवा जप्त; चालकांविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** धर्माबाद तालुक्यातील सिरजखेड आणि दिग्रस परिसरात असलेल्या गोदावरी नदीतून अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या दोन हायवा ट्रक पोलीस निरीक्षक सदाशिव भडीकर व त्यांच्या टीमने जप्त केल्या. पोलिसांनी यावेळी दोन्ही चालकांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशावरून धर्माबाद ठाण्याचे पोलीस निरीक्षक सदाशिव भडीकर यांनी दिनांक २० फेब्रुवारी रोजी स्वतः पोलीस अंमलदार यांना सोबत घेऊन बाभळी शिवारातील गोदावरी नदीचे पुलाजवळ दिग्रस शिवारातील आणि सिरजखेड शिवारातील गोदावरी नदीचे पुलाजवळ नाकाबंदी केली. नाकाबंदी दरम्यान वेळ तीन वाजताच्या सुमारास सिरजखेड शिवारातील गोदावरी नदीचे पुलाजवळ



एक हायवा (क्र TG-१६-टी-१२८०) किमती ८ लाख रुपये ज्यामध्ये अंदाजे ५ ब्रास लाल रेती किमती २५ हजार रुपयांची भरुन चोरटी वाहतूक करत होता. तसेच नाकाबंदी दरम्यान वेळ सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास दिग्रस शिवारातील गोदावरी नदीचे पुलाजवळ एक हायवा (क्र MH २६ CH ३४२६) किमती २० लाख रुपयांचा ज्यामध्ये अंदाजे ५ ब्रास लाल रेती किमती २५ हजार रुपयाची असा एकूण २८ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. दोन्ही हायवा चालकाजवळ रेती वाहतुकीचा परवाना (रॉयल्टी) नसल्याने सरकारतर्फे पोलीस उपनिरीक्षक बसवंत मुत्तेपोड आणि पोलीस अंमलदार गजानन दारेबोईनवाड यांच्या फिर्यादीवरून हायवा चालक शेख मौलासाब नन्हे साब (वय ४२) रा. कारला बु. ता. बिलोली व जयमारुती देविदास आयतोड (वय २१) रा. रावणगाव ता. भोकर याच्याविरुद्ध धर्माबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## राष्ट्रीय महामार्गाच्या दुरुस्तीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना साकडे





**किनवट (प्रतिनिधी)–** राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, जि. प. बांधकाम विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे गेल्या ८ वर्षांपासून गोकुंदा–किनवट रस्त्याची दुरवस्था झाली आहे. अनेकदा मागणी करूनही प्रशासनाचे रस्त्याच्या मजबुतीकरणाकडे दुर्लक्षच होत असल्याने राजकीय पदाधिकाऱ्यांनी शुक्रवार, दि. २० रोजी किनवट भेटीवर आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांना रस्ता दुरुस्त करून देण्याची मागणी केली आहे.

धनोडा–चिखली राष्ट्रीय महामार्गाचे काम गेल्या ८ वर्षानंतरही अपूर्णच आहे. त्यातच गोकुंदा येथे उड्डाणपूल होणार म्हणून गोकुंद्याच्या सेंट मेरी स्कूल ते गोकुंदा पेट्रोलपंपापर्यंतचा रस्ता पूर्ण करण्यात आला नाही. परिणामी या राष्ट्रीय महामार्गावर धुळीसोबतच खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. गटारीचे पाणी थेट राष्ट्रीय महामार्गावर सोडण्यात येत असल्याने रस्त्यावरील खड्डे भरून अपघात घडत आहेत. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद बांधकाम विभाग सदर रस्त्याच्या मजबुतीकरणाबाबत एक दुसऱ्याकडे टोलवाटोलवी करीत असल्याने हा रस्ता नेमका कोणाच्या अखत्यारित आहे, हे कळत नाही. दिवसेंदिवस रस्त्यावर खड्डे व धुळीचे साम्राज्य वाढत चालल्याने अपघातांसह नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. आंदोलन, उपोषणाचा इशारा देताच सदर रस्त्यावर चुरी टाकण्यात येते. त्यानंतर पुन्हा आठवडाभरात पहिलेच हाल होत आहेत. वारंवार विनंती करूनही रस्त्याच्या मजबुतीकरणाकडे संबंधितांचे दुर्लक्ष होत असल्याने शुक्रवारी प्रशासकीय कामकाजानिमित्त किनवट भेटीवर आलेले जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांना रस्त्याच्या मजबुतीकरणाबाबत भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष संदीप केंद्रे, गोकुंदाचे उपसरपंच सरू शेख व माजी जि.प. सदस्य प्रवीण मॅकलवार यांनी निवेदन देऊन चर्चा केली.

## शिवजयंतीमध्ये डीजे लावणाऱ्या आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल; पोलिसांशी हुज्जत घालून डीजे आणि ट्रॅक्टर पळविला

**नांदेड (प्रतिनिधी)–** छत्रपती शिवाजी महाराज जयंती मिरवणुकीमध्ये जयंती मंडळांनी पोलीस प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन न करता डीजे वापरला. पोलिसांनी त्यांना प्रतिकार केला असता जयंती मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी पोलिसांशी हुज्जत घालत शासकीय कामात अडथळा निर्माण केला. एवढेच नाही तर डीजे आणि ट्रॅक्टर पळवून नेले. या प्रकरणी भाग्यनगर ठाण्यात शुभम कल्याणकरसह आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तरोडा येथील शुभम दिलीपराव कल्याणकर (वय २८), आशुतोष भास्कर शिंदे (वय २९), रा. गजानन महाराज कमान मालेगाव रोड, अवतारसिंग चंदनसिंग बाजवा (वय ५८) रा. नंदिग्राम सोसायटी, केदारनाथ कैलास कपाटे आणि त्यांचे अन्य चार सहकारी यांनी विनापरवानगी पोलिसांनी सूचना देऊनही शिवजयंती मिरवणुकीमध्ये डीजे लावला. राज कॉर्नरपासून ते आयटीआय दरम्यान डीजे वाजत– गाजत जात असताना पोलिसांनी आक्षेप घेतला. पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांनी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर व्यंजने यांच्या आदेशावरून डीजे व वाहन जप्त करण्याचा प्रयत्न केला. मात्र यावेळी शुभम कल्याणकर व त्याच्या आठ साथीदारांनी पोलिसांसोबत हुज्जत घातली. एवढेच नाही तर ज्या ट्रॅक्टरवर डीजे लावला होता तो ट्रॅक्टर पळवून नेला आणि शासकीय कामात अडथळा निर्माण केला. या प्रकरणी पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांच्या फिर्यादीवरून भाग्यनगर पोलीस ठाण्यात आठ जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## चिटमोगरा येथे अज्ञात व्यक्तीकडून हरभऱ्याच्या गंजीला आग; शेतकऱ्याचे लाखोंचे नुकसान



**शंकरनगर (प्रतिनिधी)–** बिलोली तालुक्यातील चिटमोगरा येथे अज्ञात व्यक्तीने हरभऱ्याच्या गंजीला आग लावल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या आगीत दोन एकर शेतातील काढणीस आलेला हरभरा पूर्णपणे जळून खाक झाला असून, शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

चिटमोगरा येथील शेतकरी त्र्यंबक मलबा देवाले यांच्या गट क्रमांक १७१ मधील शेतात हरभरा काढून गंजी करून ठेवण्यात आला होता. दि. २० फेब्रुवारी रोजी दिवसभर पती–पत्नीने शेतात काम करून संध्याकाळी साडेसातच्या सुमारास घरी परतल्यानंतर अज्ञात व्यक्तीने अंधाराचा फायदा घेत गंजीला आग लावल्याची माहिती समोर आली आहे. शेजारील शेतकरी अहमद साहेब शेख यांनी शेतातून धूर व ज्वाळा दिसताच आरडाओरड केली. त्यामुळे आजूबाजूचे शेतकरी धावून आले. मात्र घटनास्थळी पाण्याची कोणतीही व्यवस्था नसल्याने संपूर्ण हरभरा जळून खाक झाला. नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, बाजारभावाचा प्रश्न अशा अनेक संकटांना तोंड देत शेतकरी कसाबसा संसार चालवित असताना ही घटना घडल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मशागतीपासून काढणीपर्यंत केलेला सर्व खर्च वाया गेल्याने संबंधित शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट ओढावले आहे. या घटनेची माहिती देत त्र्यंबक मलबा देवाले यांनी तहसील कार्यालय बिलोली, तलाठी, कृषी सहाय्यक तसेच रामतीर्थ पोलीस ठाणे येथे निवेदन दिले असून अज्ञात व्यक्तीवर कठोर कारवाई करावी व हरभरा पिकाची नुकसानभरपाई तत्काळ द्यावी, अशी मागणी केली आहे. दरम्यान, कृषी सहाय्यकांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला व नुकसानीची पाहणी केली.

## माहूर गड येथे जिल्हा परिषद कर्मचारी युनियनचे आज राज्यस्तरीय अधिवेशन

**नांदेड (प्रतिनिधी)** –महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियन (ओंकार)चे राज्यस्तरीय अधिवेशन माहूर गड येथे होत असून, रविवार, दि. २२ रोजी माहूर गडाच्या पायथ्याशी मातृतीर्थ रस्त्यावरील पर्यटक सुविधा केंद्र येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या अधिवेशनासाठी राज्यभरातील जिल्हा परिषद कर्मचारी मोठ्या संख्येने माहूर येथे दाखल झाले आहेत.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माहूरचे नगराध्यक्ष फिरोज दोसानी भूषविणार असून, उद्घाटक म्हणून जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष समाधान जाधव उपस्थित राहणार आहेत. प्रमुख उपस्थितीमध्ये राज्याध्यक्ष बलराज मगर (धुळे), राज्य कार्याध्यक्ष बाबुराव पुजरवाड (नांदेड), राज्य सचिव सुनील जानवरकर (अकोला), कोषाध्यक्ष विजयकुमार हाळदे (नाशिक) तसेच मंत्रालय संपर्क प्रमुख रामचंद्र मडके (ठाणे मुंबई) यांचा समावेश आहे.

अधिवेशनात कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांवर चर्चा होणार आहे. यामध्ये वेतनातील त्रुटी दूर करणे, जुनी पेन्शन योजना लागू करणे, राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे सर्व लाभ देणे, अनुकंपा भरती तात्काळ करणे, वाहन चालक व शिपाई पदांची पूर्ववत भरती करणे तसेच कंत्राटी पद्धत रद्द करणे या प्रमुख मागण्या मांडण्यात येणार आहेत. यासंदर्भात माहिती कर्मचारी युनियन नांदेडचे जिल्हाध्यक्ष धनंजय गुम्मलवार, जिल्हा सचिव राघवेन्द्र मदनूरकर, उपाध्यक्ष संतोष मठपती, गजानन अगनमोर, सचिन चोदंते, रणजीत गजभरे, मंगेश ढेंबरे तसेच माहूर तालुका अध्यक्ष जयराम केंद्रे यांनी दिली.

## २७, २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी होणार २० वे विद्रोही मराठी साहित्य संमेलन

**नांदेड (प्रतिनिधी)–** विद्रोही सांस्कृतिक चळवळ आयोजित व संविधान मूल्यांना समर्पित २० व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली असून, २७, २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी होणाऱ्या या संमेलनासाठी सायन्स कॉलेजच्या सदाशिवराव पाटील क्रीडा संकुलाच्या मैदानावर उभारण्यात आलेली साहित्य नगरी विद्रोही साहित्यिकांच्या स्वागतासाठी सज्ज झाली आहे, अशी माहिती स्वागताध्यक्ष राहुल प्रधान यांनी पत्रकार परिषदेत दिली.



या पत्रकार परिषदेस डॉ. राजेंद्र गोणारकर, डॉ. अनंत राऊत, प्रा. विठ्ठल भंडारे, इंजि. भीमराव हाटकर, राज गोडबोले, इंजि. भारत कानिंदे, विठ्ठल असूरे, कॉ. उज्ज्वला पडलवार, डॉ. विजयकुमार माहुरे आदींची उपस्थिती होती. संमेलनाच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध कवी लोकनाथ यशवंत (नागपूर) यांची निवड झाली असून उद्घाटक म्हणून हिंदीतील ख्यातनाम समीक्षक डॉ. बजरंग बिहारी तिवारी (दिल्ली) उपस्थित राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. मिलिंद आव्हाड (दिल्ली) यांची उपस्थिती लाभणार आहे.

इंजि. चंद्रशेखर शिखरे, डॉ. रेखा शेळके आणि डॉ. प्रतिभा अहिरे यांच्या अध्यक्षतेखाली तीन स्वतंत्र परिसंवाद आयोजित करण्यात आले आहेत. विशेष आकर्षण म्हणून सुप्रसिद्ध पत्रकार राजू परुळेकर यांचे व्याख्यान होणार आहे. संमेलनात निमंत्रितांच्या कवी संमेलनासह तीन स्वतंत्र कवी संमेलने पार पडणार आहेत. तसेच सुप्रसिद्ध सिने–नाट्य अभिनेते मिलिंद शिंदे (मुंबई )यांच्याशी डॉ. राजेंद्र गोणारकर संवाद साधणार असून, त्यांच्या कविताही रसिकांना ऐकावयास मिळणार आहेत.

सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत प्रेमानंद गज्वी लिखित 'घोटभर पाणी' ही एकांकिका सादर होणार आहे. तसेच 'मी जनाबाई' आणि 'मी सावित्रीबाई फुले' हे एकपात्री प्रयोगही रंगणार आहेत. याशिवाय सुप्रसिद्ध पत्रकार ज्ञानेश महाराव यांचे 'शाहिरांचे गणराज्य लोकशाहीचा सांस्कृतिक प्रवास' हे संगीत व्याख्यान होणार आहे. संमेलनाच्या पूर्वसंध्येला, म्हणजे २७ फेब्रुवारी रोजी रात्री ८ वाजता, पँथर पद्मश्री नामदेव ढसाळ यांच्या कवितांवर आधारित 'भयंकराच्या दरवाजात कोण' हे नृत्यनाट्य सादर करण्यात येणार आहे. या प्रभावी कलाप्रयोगाचे दिग्दर्शन पुणे येथील दिग्दर्शक मयूर शितोळे यांनी केले आहे. विद्रोही विचारधारेची काव्यात्मक व रंगमंचीय अभिव्यक्ती असलेला हा कार्यक्रम संमेलनाचे विशेष आकर्षण ठरणार आहे.

संमेलन परिसरात विविध प्रकारच्या चित्रप्रदर्शनाचे कलादालन उभारण्यात आले असून, महाराष्ट्रातील विविध प्रकाशनांच्या पन्नासहून अधिक ग्रंथदालनांचा सहभाग असणार आहे. समारोप कार्यक्रमासाठी प्रो. रतनलाल (दिल्ली) आणि प्रियंका भारती यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

या तीन दिवसीय संमेलनात महाराष्ट्रातील प्रगतिशील साहित्यिक, कवी, कलावंत तसेच पाच हजारांहून अधिक साहित्यप्रेमी सहभागी होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. पत्रकार परिषदेत संमेलनाची भूमिका, कार्यक्रमांची रूपरेषा आणि जनसहभागातून उभ्या राहणाऱ्या या संमेलनाच्या वैशिष्ट्यांवर सविस्तर माहिती देण्यात आली. नांदेड नगरी विद्रोह साहित्यिकांच्या स्वागतासाठी पूर्णतः सज्ज असल्याचा विश्वास संयोजन समितीने व्यक्त केला.




**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com